Made with Xodo PDF Reader and Editor

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, १६ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मणिपूरमध्ये लवकरच परिस्थिती ठीक होईल : अमित शाह



नवी दिल्ली, १५ डिसेंबर (हिं.स.) : मी हे निमित्त म्हणून सांगत नाही, तर पार्श्वभूमीबद्दल बोलत आहे. मणिपूरमध्ये जेव्हा-जेव्हा वांशिक हिंसाचार झाला, तेव्हा तो दीड वर्ष चालू राहिला. अनेक वेळा हिंसाचार तीन वर्षांपर्यंत चालला असून त्यात अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे. जातीय हिंसाचारामुळे हे घडले. मात्र, आता हिंसाचार बऱ्यापैकी कमी झाला आहे, त्यामुळे या लोकांनाही संसदेत गदारोळ करून विषय भडकावायचा आहे. पण आता परिस्थिती ठीक होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला. एका मुलाखतीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

मणिपूर दीड वर्षांहून अधिक काळ धुमसत आहे. मे २०२३ मध्ये सुरू झालेल्या या संघर्षात ३०० हून अधिक लोक मारले गेले आहेत आणि हजारो लोक विस्थापित झाले आहेत. इम्फाळ खोऱ्यात राहणारा मेईतेई समाज आणि आजूबाजूच्या डोंगराळ भागात राहणारा कुकी समाज यांच्यात हा तणाव आहे. बहुसंख्य मेईतेई समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याच्या मागणीच्या विरोधात गेल्या वर्षी एकता मोर्चा काढल्यानंतर उसळलेला जातीय हिंसाचार आजही कायम आहे. विरोधकांकडून याच मुद्द्यावरुन केंद्र सरकारला घेरण्याचा वारंवार प्रयत्न देखील केला जात आहे. अशातच शनिवारी ककचिंग जिल्ह्यात दोन मजुरांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर येथील परिस्थिती पुन्हा एकदा तणावपूर्ण बनली आहे. मणिपूरमधल्या लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# महायुतीच्या ३९ मंत्र्यांनी घेतली शपथ

## राज्यपालांनी नागपुरात दिली पद व गोपनियतेची शपथ

नागपूर, १५ डिसेंबर : महायुतीच्या नवनिर्वाचित सरकारमधील ३९ सहकाऱ्यांचा शपथविधी सोहळा आज, रविवारी नागपुरात पार पडला. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी या लोकप्रतिनिधींना राजभवनात पद व गोपनियतेची शपथ दिली.

राज्यमंत्रिमंडळाच्या विस्तारात भाजपच्या वाट्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह २० मंत्रिपदे आली आहेत. शिवसेनेत एकनाथ शिंदेंसह १२ जणांना मंत्रिपदे मिळली आहेत. तर राष्ट्रवादीला अजित पवारांसह १० खाती मिळणार आहेत. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या या शपथविधी सोहळ्यात महायुतीच्या ६ जणांना राज्यमंत्रीपदाची शपथ देण्यात आलीय. नागपुरात झालेल्या शपथविधी सोहळ्यामध्ये भाजपच्या १९, शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यावेळच्या मंत्रिमंडळ विस्तारात अनेक जुन्या चेहऱ्यांना डच्चू देण्यात आला असून पंकजा मुंडे आणि चंद्रशेखर बावनकुळेंचे मंत्रिमंडळात कमबॅक झाले आहे. भाजपतर्फे शपथ घेणाऱ्या लोकप्रतिनिधींमध्ये आमदार नितेश राणे, शिवेंद्र राजे भोसले, चंद्रकांत पाटील, पंकज भोयर, मंगलप्रभात लोढा, गिरीश महाजन, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, राधाकृष्ण विखे पाटील, गणेश नाईक, मेघना बोर्डीकर, अतुल सावे ,जयकुमार गोरे, माधुरी मिसाळ, चंद्रशेखर बावनकुळे, संजय सावकारे, अशोक उईके, आकाश फुंडकर आणि आशिष शेलार यांचा समावेश आहे.



शिवसेनेतर्फे शपथ घेणाऱ्यांमध्ये उदय सांमत, प्रताप सरनाईक, शंभूराज देसाई, योगश कदम, आशिष जैस्वाल, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर, दादा भूसे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट यांचा समावेश आहे. यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे, बाबासाहेब पाटील, दत्तमामा भरणे, हसन मुश्रीफ, नरहरी झिरवाळ, मकरंद पाटील, इंद्रनील नाईक, धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांनी पद व गोपनियतेची शपथ घेतली.

# पुण्यातून कुंभमेळयासाठी धावणार १२ विशेष रेल्वेगाड्या




पुणे, १५ डिसेंबर : पुण्यावरून कुंभमेळाव्यासाठी मोठ्या प्रमाणात भाविक जातात. रेल्वेचा कमी दरात प्रवास सुरक्षित व चांगला असल्याने ज्येष्ठ नागरिकांसह प्रवाशांची कुंभमेळात गर्दी असते. या मेळाव्यात अतिरिक्त गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी मध्य रेल्वे विभागाकडून पुणे ते मऊ जंक्शन दरम्यान अतिरिक्त कुंभमेळा विशेष १२ गाड्या चालवण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे. या विशेष गाड्यांच्या तपशील संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर व www.irctc.co.in या संकेतस्थळावर असून, त्याची प्रवाशांनी नोंद घ्यावी, असे आवाहन रेल्वेकडून करण्यात आले आहे गाडी क्रमांक ०१४५५ पुणे ते मऊ जं. कुंभमेळा स्पेशल ट्रेन पुण्याहून दि. ८, १६, २४ जानेवारी व दि. ६,८ फेब्रुवारीला सकाळी १०.१० वाजता निघेल आणि पुढच्या दिवशी २२.०० वाजता पोहोचेल. तसेच गाडी क्रमांक ०१४५६ मऊ ते पुणे कुंभमेळा विशेष गाडी मऊ येथून (दि. ९, १७,२५ जानेवारी व दि. ७,०९ फेब्रुवारी रात्री २३.५० वाजता सुटेल ती तिसऱ्या दिवशी १५.४५ वाजता पुण्याला पोहोचेल.




# अल्पावधीच्या अधिवेशनामुळे अपेक्षाभंग : विजय वडेट्टीवार

## राज्य सरकारच्या चहा-पानावर मविआचा बहिष्कार

नागपूर ,१५ डिसेंबर : राज्यात महायुतीचे सरकार आणि विदर्भातील मुख्यमंत्री बनल्यामुळे सरकारच्या पहिलेच अधिवेशन अतिशय कमी कालावधीचे आहे. अल्पावधीच्या या अधिवेशनामुळे जनतेचा अपेक्षाभंग झाल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. तसेच सरकारतर्फे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहा-पानावर बहिष्कार टाकत असल्याचे त्यांनी जाहीर केले. नागपुरातील रवि भवन परिसरात आयोजित महाविकास आघाडीच्या (मविआ) पत्रकार परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते.



हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निवासस्थानी महाविकास आघाडीची बैठक पार पडली. या बैठकीला विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते जितेंद्र आव्हाड, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मुख्य प्रतोद सुनील प्रभू, महेश सावंत, ज. मो.अभ्यंकर हे उपस्थित होते. बैठकीनंतर महाविकास आघडीच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेला संबोधीत केले. यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड, उबाठाचे प्रतोद सुनील प्रभू, आमदार महेश सावंत, आमदार ज. मो. अभ्यंकर उपस्थित होते.

याप्रसंगी वडेट्टीवार म्हणाले की, एकीकडे शेतकरी आत्महत्या होत आहे, सोयाबीन, धान कापसाला हमीभाव मिळत नाही. विदर्भात खूप मोठे प्रश्न आहेत, पण त्याला या सरकारने हरताळ फासला आहे. शाहू फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रात संविधानाची विटंबना झाली. यानंतर आंबेडकरी जनतेने आंदोलने केले पण त्यातही कोम्बिंग ऑपरेशनच्या माध्यमातून कारवाई करण्यात आली. अनेक कार्यकर्त्यांना मारहाण झाली, धरपकड करण्यात आली. त्यातही एक कार्यकर्त्याचा मृत्यू झाला, हे संतापजनक असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. बीड मध्ये एका सरपंचाचे अपहरण करून त्याची निर्घृणरित्या हत्या करण्यात आली. ह्यातील आरोपीला राजकीय वरदहस्त आहे. खून करणाऱ्या आरोपीला राजकीय आश्रय देणारे आज मंत्री केले जाते, त्यामुळे या खुनी सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

# मुंबईत पुन्हा बेस्टचा अपघात, २५ वर्षीय युवकाचा मृत्यू

मुंबई, १५ डिसेंबर : मुंबईत बेस्ट बसने पुन्हा एकदा अपघात घडवून आणला आहे. शिवाजीनगर ते कुर्ला मार्गावर प्रवास करत असताना या बसने दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये २५ वर्षीय युवक गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. दीक्षित विनोद राजपूत असे २५ वर्षीय मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीव्हीजी ग्रुपच्या ओला भाडेतत्त्वावरील बसचा गोवंडी येथील शिवाजी नगरमध्ये भीषण अपघात झाला आहे. शनिवारी (१४ डिसेंबर) रात्री साडे अकराच्या सुमारास बस क्रमांक -३५० ही बस गोवंडीतील शिवाजीनगर बस डेपोतून कुर्ला येथे जाण्यासाठी निघाली होती. रात्री १२.१५ च्या सुमारास शिवाजी नागर जंक्शन हायवे बस स्टॉपच्या पुढे सदर बसला उजव्या बाजूने एक दुचाकी ओव्हरटेक करत असताना अपघात घडला आहे. दुचाकीवरील तरुण बसच्या मागील चाकाखाली आला. यावेळीच बसचा मागील बाजूचा टायर फुटला आणि तरुणाच्या डोक्याला दुखापत झाली. जखमी व्यक्तीला पोलिसांनी व्हॅन टाकून तातडीने घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात नेले, मात्र तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. ३९ वर्षीय विनोद आबाजी रणखांबे हे बसचालक असून ३९ वर्षीय अविनाश विक्रमराव गिते हे अपघातग्रस्त बसवर कंडक्टर होते.

मुंबईतील बेस्ट बस अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. गेल्या आठ महिन्यांत बेस्ट बस अपघातांमध्ये एकूण २२ जणांनी आपले प्राण गमावले आहेत.

# मुख्यमंत्री फडणवीसांचे नागपुरात भव्य स्वागत

## विमानतळापासून जल्लोषात निघाली मिरवणूक, केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी दिला आशीर्वाद

नागपूर, १५ डिसेंबर : राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच नागपुरात डेरेदाखल झालेल्या देवेंद्र फडणवीस यांचे आज, रविवारी भव्य स्वागत करण्यात आले. भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्या सोबतच सर्वसामान्य नागरिकांनी पुष्पवृष्टीकरत फडणवीस यांचे जल्लोषात स्वागत केले. नागपूर विमानतळ ते फडणवीसांच्य निवासस्थानादरम्यान निघालेल्या या मिरवणुकीत हजारो जण सहभागी झाले होते.



मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर फडणवीस यांचे १२ तारखेला नागपुरात आगमन होणार होते. परंतु, काही कारणास्तव तो मुहूर्त टळला आणि १५ तारीख निश्चित करण्यात आली. फडणवीसांच्या स्वागतासाठी विमानतळ ते त्यांचे धरमपेठमधील निवासस्थान असा मिरवणुकीचा मार्ग ठरला. नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानतळावर मुख्यमंत्र्यंचे आगमन होताच ढोल, ताशे, नगारे, डीजे अशा नानाविध वाद्यांच्या गजरात सजवलेल्या ट्रकवरून फडणवीसांची मिरवणूक सुरू झाली. यावेळी ट्रकवर मुख्यमंत्र्यांसह त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांचे स्वागत स्वीकारत ही मिरवणूक हजारो कार्यकर्त्यांसह पुढे सरकली. मुख्यमंत्र्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. तसेच विमानतळ चौकातील हेडगेवार स्मारकाला नमन केले. पुढे कार्यकर्त्यांची गर्दी, विविध लोकनृत्य सादर करणारे पथक असे दृष्य नागपूरकरांनी अनुभवले.

याप्रसंगी मिरवणुकीत ‘विजेता तू.. देवाभाऊ चल पुढे’..‘तुमची आमची सर्वांची भाजप’ व यासह वाजवली जाणारी गीते अनेकांचे लक्ष वेधून घेत होती. मिरवणुकीच्या मार्गात स्वागतासाठी चौका-चौकात ६० ते ६२ मंच उभारण्यात आले होते. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी बाईक रॅली काढली होती. इमारतींवर उभे राहून नागपूरकर नागरिक त्यांचे हात दाखवून स्वागत करीत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागपूरमध्ये आगमन झाल्यावर त्यांच्या स्वागतासाठी खुद्द केंद्रीय मंत्री नितीन गडकरी रस्त्यात उभे होते. नागपुरातील खामला परिसरात स्वतः गडकरींनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत, अभिनंदन करून त्यांना आशीर्वाद दिला. तब्बल ४ तास चाललेली ही मिरवणूक पाहुन आला रे... पुन्हा आला...! अशा शब्दात सर्वसामान्य नागपूरकर आपली भावना व्यक्त करत होते.

# ट्रम्प राजवटीत अमेरिकेतून तब्बल १८ हजार भारतीयांच्या हद्दपारीची शक्यता

वॉशिंग्टन , १५ डिसेंबर : अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकिर्दीत अमेरिका सुमारे १८ हजार भारतीयांना हद्दपार केले जाऊ शकते.अमेरिकन इमिग्रेशन आणि कस्टम एन्फोर्समेंटने जारी केलेल्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली आहे.ज्यामुळे १८,००० भारतीय नागरिकांना हद्दपारीचा सामना करावा लागला. यूएस इमिग्रेशन अँड कस्टम एन्फोर्समेंट (खउए) ने जारी केलेल्या अहवालानुसार, अमेरिकेतील एकूण १.४५ दशलक्ष निर्वासितांमध्ये १८,००० बेकायदेशीर भारतीयांचा समावेश आहे.





ट्रम्प यांच्या प्रशासनाने इमिग्रेशन नियमांच्या कडक अंमलबजावणीसाठी कठोर पाऊले उचलली होती. या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे भारतीय आणि इतर विदेशी नागरिकांसाठी अमेरिकेत असणे कठीण झाले आहे. आयसीईने म्हटले आहे की, योग्य कागदपत्रांशिवाय अमेरिकेत राहणाऱ्या स्थलांतरितांना हद्दपार करणे हा ट्रम्प यांचा सीमा सुरक्षा अजेंडा आहे. ट्रम्प पुढील महिन्यात २० जानेवारीला अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून शपथ घेणार असून, त्यांच्या सरकारने पुन्हा एकदा इमिग्रेशन नितीतील कडक अंमलबजावणीला चालना देण्याची शक्यता आहे. त्यामुळे बेकायदेशीर स्थलांतरितांसाठी अमेरिकेची भूमिकाही आणखी कठोर होऊ शकते.आयसीईने नोव्हेंबर २०२४ मध्ये ही आकडेवारी जाहीर केली होती. यानुसार, १७,९४० भारतीयांना अंतिम आदेशाच्या यादीत ठेवण्यात आले आहे, हे लोक सध्या आयसीईच्या ताब्यात नाहीत, परंतु ते निर्वासित होण्याची वाट पाहत आहेत. यातील अनेक भारतीयांनी तीन वर्षांहून अधिक काळ कायदेशीर प्रक्रिया सहन केली आहे.

अहवालानुसार, आशियातील अवैध स्थलांतरितांच्या बाबतीत भारताचा क्रमांक १३ वा आहे. यासोबतच निर्वासन प्रक्रियेत ‘असहकार’ मानल्या गेलेल्या १५ देशांमध्ये भारताचाही समावेश आहे.ज्यांच्यावर निर्वासन प्रक्रियेत सहकार्य न केल्याचा आरोप आहे. आकडेवारीनुसार, गेल्या ३ वर्षांत सुमारे ९०,००० भारतीय बेकायदेशीरपणे अमेरिकेच्या सीमेत प्रवेश करताना पकडले गेले आहेत. त्यापैकी बहुतांश पंजाब, गुजरात आणि आंध्र प्रदेश या राज्यांतील आहेत, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तथापि, अहवालात असेही म्हटले आहे की बहुतेक बेकायदेशीर स्थलांतरित हे अमेरिकेच्या सीमेजवळच्या देशांतून येतात. या यादीत होंडुरास आणि ग्वाटेमाला आघाडीवर आहेत. जर आपण आशियाबद्दल बोललो तर ३७,९०८ अवैध स्थलांतरितांसह चीन पहिल्या क्रमांकावर आहे.१७,९४० स्थलांतरितांसह भारत एकूण क्रमवारीत १३ व्या क्रमांकावर आहे. हा अहवाल ट्रम्प प्रशासनाच्या इमिग्रेशन धोरणांच्या कठोरतेचे प्रतिबिंबित करतो आणि भविष्यात इमिग्रेशनशी संबंधित धोरणे अधिक कठोर होऊ शकतात असे सूचित करतो.



Made with Xodo PDF Reader and Editor



# तीर्थक्षेत्र दत्तधामला जयघोषात दत्त जन्मोत्सव,हजारो भाविकांची उपस्थिती

## धार्मिक विधींसह कीर्तन, दर्शनासाठी भाविक भक्तांची सकाळपासून एकच गर्दी

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील वसमत रस्त्यावरील तीर्थक्षेत्र दत्तधाम या ठिकाणी शनिवारी (दि.१४) सायंकाळी सहा वाजता हजारो भाविकांच्या उपस्थितीत व 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्हव दिगंबरा' अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त या गजरात, प्रचंड जयघोषात श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दत्तधाम या ठिकाणी दत्त जयंतीच्या निमित्ताने भरगच्च असे धार्मिक विधी, महाअभिषेक, भजन-कीर्तन व जन्मोत्सव अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वसमत रस्त्यावरील हे तीर्थक्षेत्र स्थान दत्त मंदिर दत्त भक्तांचे प्रमुख श्रद्धास्थान मानले जाते. त्यामुळेच या ठिकाणी दत्त जयंतीच्या निमित्ताने मंदिरात पहाटेच या तीर्थक्षेत्रस्थानी श्री दत्तात्रयाच्या दर्शनाकरीता मोठ्या रांगा लागल्या. त्या बरोबरच या ठिकाणी सकाळी महाअभिषेकास अन्य धार्मिक विधींना सुरुवात झाली. महारुद्र अभिषेकाचा सोहळा ९० ब्रम्हवृंदांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. दुपारी महानैवेद्याचा व आरतीचा कार्यक्रम झाला. त्या पाठोपाठ प्रसाद वाटपाचाही कार्यक्रम दिवसभर सुरु होता. उपवासाच्या निमित्त पूर्ण फराळाचीची व्यवस्था संस्थांच्या वतीने करण्यात आली होती. दत्त जयंतीच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मंदिराला आकर्षक रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली. सुंदर व भव्य अशी रांगोळीसुध्दा काढण्यात आली होती. भक्तगणांनी काढलेली ही रांगोळी भाविकांसाठी लक्षवेधी ठरली.




आज पौर्णिमा तिथी ही संध्याकाळी ५ वाजता सुरु झाली असून दुसऱ्या दिवशी १५ डिसेंबर रोजी दुपारी २.३३ वाजपर्यंत असणार आहे. दत्त जयंती ही पौर्णिमा तिथीला आणि संध्याकाळी ६ वाजता साजरी करण्यात येते. म्हणून या तीर्थक्षेत्र ठिकाणी सायंकाळी हभप अच्युत महाराज दस्तापुरकर यांच्या कीर्तनाचा सोहळा सायंकाळी ५ वाजता सुरु झाला. दस्तापूरकर महाराज यांनी आपल्या सुंदर वाणीतून, कीर्तनातून श्रीदत्तगुरु यांची महिमा विशद केली. त्यास हजारो भाविक उपस्थित होते. महिलांची संख्या लक्षणीय होती. या कीर्तन सोहळ्यानंतर प्रमुख असा कार्यक्रम म्हणजे श्री दत्त जन्मोत्सवास प्रारंभ झाला. सायंकाळी सहा वाजता हजारो दत्त भक्तांच्या उपस्थितीत 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्हव दिगंबरा' अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त या गजरात, प्रचंड जयघोषात श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. आरतीने या जन्मोत्सवाचा समारोप झाला. भाविकांनी दर्शनाकरीता रात्री उशीरापर्यंत रांगा लावल्या होत्या. तत्पूर्वी दीपोत्सवाचाही कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या मंदिराच्या सभागृहात १००८ दिवे भक्तगणांद्वारे प्रज्वलित करण्यात आले. या दिपोत्सवाने सभागृह व मंदिर परिसर उजळून निघाला. दरवर्षीप्रमाणे सायंकाळी जन्मोत्सवानंतर पालखी सोहळ्याची तयारी सुरु झाली होती.



या जन्मोत्सव सोहळ्याकरीता दत्तधाम संस्थानचे प्रमुख मकरंद महाराज, त्यांचे सहकारी मुकुंद महाराज यांच्यासह अच्युतराव कारेगांवकर, अनंतराव देशमुख, अच्युतराव आवचार, बाबाराव काळे, नितीन सुरदास, शहाजी जासूद, जीवन ऋषी, अरुण कोल्हटकर, शेखर लांडगे, मधुकर रतपारखी, सुरेंद्र जोशी, शंतनू पांडे, बाबासाहेब आवचार, भगवानराव आवचार, श्री. रतपारखी, यांच्यासह अन्य दत्तभक्तांनी संपूर्ण नियोजनासह कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...

### अवमान करणाऱ्या आरोपींची नार्को तपासणी करा- प्रा.जोगेंद्र कवाडे

**परभणी,/प्रतिनिधी-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीच्या काचेची तोडफोड करणाऱ्या आरोपीला देशद्रोही जाहीर करून त्याचे नागरिकत्व रद्द करावे, त्याची नार्को तपासणी करावी, अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी शनिवारी (दि.१४) पत्रकार परिषदेत केली.

प्रा.कवाडे यांनी आज परभणीचा दौरा केला. त्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तेथील घडलेल्या त्या घटनेची माहिती घेतली. त्या पाठोपाठ भीम नगरात पोलिसांकडून झालेल्या अत्याचारातील जखमी नागरिकांची भेट घेतली. त्यांच्या बरोबर हितगुज केले. त्यानंतर प्रभारी पोलिस अधीक्षक यशवंत काळे व जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांची भेट घेवून चर्चा करत तपशीलवार मागण्यांचे निवेदन सादर केले.

दरम्यान, पत्रकार परिषदेला प्रदेश कार्याध्यक्ष चरणदास इंगोले, प्रदेश महासचिव बापूराव गजभारे, प्रदेश संघटक गौतम मुंढे, अरुण गायकवाड, संजय शिंदे, दीपक धापसे, मोहन गायकवाड, चंद्रकांत कांबळे, हिंगोली जिल्हाध्यक्ष दिलीप भिसे, नारायण गायकवाड, साहेबराव सोनकांबळे यांची उपस्थिती होती.

### परभणीत आज महिला लोकशाही दिन

**परभणी,/प्रतिनिधी-** समस्याग्रस्त व पीडित महिलांनी सोमवार, दि. १६ डिसेंबर, २०२४ रोजी महिला लोकशाही दिनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन घेण्यात येतो.

सोमवार, दि. १६ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधीत समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित राहावे. समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांना न्याय मिळावा तसेच समाजातील त्यांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. तरी जिल्ह्यातील महिलांनी त्यांच्या वैयक्तिक स्वरूपाच्या तक्रारी विहीत नमुन्यात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, परभणी यांच्या कार्यालयात दाखल करण्यात याव्यात, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

### गाळयुक्त शिवार अभियानांतर्गतच्या कामाची चौकशी करा- भोगाव साबळेचे निवेदन सादर

**परभणी,/प्रतिनिधी-** तालुक्यातील भोगाव साबळे येथे गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानातंर्गत झालेल्या भ्रष्ट कामाची कसून चौकशी करावी, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे नेते आनंद भरोसे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी सोमवारी (दि.०९) जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर केलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

महात्मा ज्योतीबा फुले खोपडी यवतमाळ या सेवाभावी संस्थेमार्फत १८ मे २०२३ ते २९ मे २०२३ या कलावधीत भोगाव (साबळे) येथील शेतकऱ्यांना तलावातील गाळ काढण्यासाठी अनुदान देण्यात आले होते. परंतु संबंधित ग्राम पंचायतीने रकमेचा अपहार करून ५५ लोकांची बनावट यादी तयार करण्यात आल्या आहेत, तसेच संबंधित एजन्सी व जलसंधारण अधिकाऱ्यांनी केवळ १० दिवस जेसीबी चालवून ५० दिवसाचे बिल उचलून भ्रष्टाचार केला, असा आरोप या निवेदनाद्वारे केला आहे. या दोन्ही प्रकरणाची कसून चौकशी करावी, संबंधितांवर कठोर कार्यवाही करावी आणि संबंधितः शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनावर दिलीप रंगनाथराव साबळे, कैलास बाबासाहेब साबळे, बाबाराव रुस्तुमराव साबळे, अमोल अशोकराव साबळे, विकास प्रभाकर साबळे, कुंडलिक साबळे, नंदाबाई साबळे, वच्छलाबाई साबळे, लताबाई साबळे, विश्वनाथ भांबरे, साहेबराव साबळे, शंकरराव साबळे, प्रयागबाई रासवे, कुशवर्ता साबळे, सुभाष साबळे, सुनंदा साबळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### सैन्यामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**परभणी,/प्रतिनिधी-** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना एसएसबी परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे राज्य शासनातर्फे दि. ३० डिसेंबर, २०२४ ते ०८ जानेवारी, २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६० आयोजित करण्यात येत आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण व निवास भोजन दिले जाते.

परभणी जिल्हातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी येथे मंगळवार, दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी मुलाखतीस उपस्थित रहावे. मुलाखतीस येतेवेळी सैनिक कल्याण विभागच्या संकेतस्थळावर एसएसबी-६० कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या प्रवेशपत्र व त्यासोबत परिशिष्टांची प्रत परिपूर्ण भरून सोबत आणावी. या प्रशिक्षणामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खालील पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत आणावेत. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आयडी व दूरध्वनी ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाट्सअप क्र. ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्याक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी परभणी यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन कार्यशाळा बुधवारी परभणीत

**परभणी,/प्रतिनिधी-** राज्यामध्ये निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी आणि निर्यात वाढीसाठी प्रत्येक जिल्ह्याला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचे बुधवार (दि.१८) रोजी आयोजन करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात निर्यात केंद्र उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत उद्योग संचालनालयाचे विकास आयुक्त यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन बुधवारी (दि.१८) सकाळी १० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृहात करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय कार्यक्रमामध्ये जिल्ह्यातील प्रमुख उद्योग क्षेत्राबाबत चर्चासत्र, गुंतवणुकीच्या संधी, इतर क्षमता असलेल्या क्षेत्रातील गुंतवणूक व व्यवसाय संधीबाबत चर्चा, उद्योजकांचे अनुभव आदिंचा समावेश असेल. या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी उत्पादक संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबधित उपक्रमांचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जिल्ह्यातील बँका, उद्योजक संघटना, शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन, कौशल्य विकास व रोजगार व जिल्ह्यातील संबंधित शासकीय यंत्रणांचे प्रमुख यांचे सहकार्याने आयोजित करण्यात आले आहे. तरी या कार्यशाळेस जास्तीत जास्त निर्यातदार उद्योग घटक, नवउद्योजक, शेतकरी सहकारी उत्पादक संस्था तसेच इतर संबंधितांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांनी केले आहे.

## आर्वीतील विद्यार्थी रमले निसर्गशाळेत... शाळेचा आवडीचा शनिवार उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी-** तालुक्यातील आर्वी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी शनिवारी आवडीचा शनिवार' उपक्रम ंतर्गत तुळजापूर या ठिकाणी निसर्गशाळेचा आनंद लूटला.

दैनंदिन जीवनामध्ये चार भिंतींच्या वर्ग खोल्यांमध्ये पाठ्यपुस्तकातील शिक्षणात विद्यार्थी गुंग आहेत. या विद्यार्थ्यांची जीवन कौशल्ये विकसित व्हावी, या दृष्टीने निसर्गशाळा हा सहशालेय उपक्रम समोर आला. आर्वीतील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक विद्यालयातील शिक्षकांनी आयोजित केलेल्या त्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्गशाळेचा अनुभव दिला. शेती-माती आणि पिके, पिकांचा उपयोग, पिकांना पाणी देण्याच्या पद्धती, पिके संरक्षण करण्याच्या पद्धती, पिके उत्पादन याबाबतीत विद्यार्थ्यांना सहज आणि सूचकपणे या गोष्टी अनुभवयास मिळाल्या.



आपले गाव आणि गावाच्या भोवतालचा परिसर, परिसराची वैशिष्ट्ये, लोकजीवन, पशु-पक्षी यांच्याबरोबरच झाडे-वेली-रानफुले-शेतकरी आणि शेतीची कामे विद्यार्थ्यांना परिचित होतीच. त्या आणखीन ज्ञानाची भर पडली. सध्या हिवाळा ऋतू सुरू असून फुललेले तुरीचे पीक आणि तुरीच्या शेंगा, बोरं, हिरव्यागार ज्वारी आणि गव्हाच्या पिकांची रानं पाहून आर्वीतील हे विद्यार्थी सुखावले.

तुळजापूर गावामध्ये तुळजाभवानी देवीचे मंदिर आहे. या मंदिरातील स्थापत्त्या कला (बांधकाम) लक्षवेधी आहे. विद्यार्थ्यांनी या स्थापत्त्या कलेची पाहणी केली. त्या कलेमागील माहिती जाणून घेतली. तसेच मनोरंजनात्मक खेळही खेळले. झाडे आणि त्यांचे उपयोग विद्यार्थ्यांनी अवगत केले. विशेषतः जीवन जगण्यासाठी झाडांपासून मिळणारा ऑक्सिजन महत्वाचा आहे, हेही विद्यार्थ्यांना शिक्षकांनी समजावून दिले. यावेळी वनभोजन आणि सहभोजनाचा आनंद विद्यार्थ्यांनी शिक्षकाबरोबर घेतला. या निसर्गशाळेचे आयोजन शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक भारत ढाणे, सौ. गंगा बाकले, सौ. अमिलकंठवार, सौ. पांचाळ, सौ. कौसडीकर, सौ. वरवटकर, लोखंडे, शहाणे, नरगरे आदींनी केले.

## गुप्तचर विभागामार्फत हिंसाचाराची चौकशी करा - केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले : पाहणी व आढावा दौरा

**परभर्णी,/प्रतिनिधी:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीच्या काचेच्या तोडफोड प्रकरणाचा केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतेवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या भारतीय संविधानाचा अवमान सहन केला जाणार नाही, संविधान मानणाऱ्यांनाच भारतात राहण्याचा अधिकार आहे. ज्यांना संविधान मान्य नसेल त्याने देश सोडावा, असे नमूद केले. व परभणीत घडलेल्या संपुर्ण घटनेची गुप्तचर विभागामार्फत कसून चौकशी करावी, अशी मागणीही केली.



केंद्रीय मंत्री आठवले यांनी शनिवारी (दि.१४) दुपारी परभणी दाखल झाल्याबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्या पाठोपाठ शासकीय विश्रामगृहावर आठवले यांनी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, प्रभारी पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाचारण करीत आढावा घेतला. त्या पाठोपाठ पत्रकार परिषदेतून पत्रकारांशी हितगुज केले. यावेळी बाबूराव कदम, ब्रम्हानंद चव्हाण, दिलीप जोशी, किशोर थोरात, बाळकृष्ण एंगडे, डॉ.सिध्दार्थ भालेराव, डी. एन.दाभाडे, जिल्हाध्यक्ष डॉ.विजय गायकवाड यांची उपस्थिती होती.

डॉ. आंबेडकर यांनी मोठ्या कष्टाने संविधान बनवले आहे. त्याद्वारे अखंड भारताची संकल्पना मांडली आहे. परभणीत काचेमध्ये ठेवलेल्या त्या प्रतिकृतीचे नुकसान करून सोपान पवार नावाच्या आरोपीने संविधानाचा अवमान करण्याचा प्रयत केला आहे, असे नमूद करीत आठवले यांनी हा प्रकार सहन न झाल्याने कार्यकर्ते व महिलांच्या भावना उफाळून आल्या. त्यातून आंदोलन केल्या गेले, असे म्हटले. या प्रकरणात त्या आरोपीविरोधात अॅट्रासिटीसह इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झालेले आहेत. आरोपीवर नांदेड येथील रूग्णालयात उपचार सुरु आहेत, तेथून सुटी मिळाल्यावर आरोपीची गुप्तचर विभागामार्फत चौकशी केली पाहिजे. या घटनेमागे आणखी कुणाचा हात आहे का? हे देखील तपासले पाहिजे, असे ते म्हणाले. वत्सलाबाई मानवते या महिलेस पोलिसांनी जबर मारहाण केल्याचेही नमूद करीत आठवले यांनी ती महिला अत्यावस्थ असल्याचे सांगितले. या प्रकरणी संबंधितांची चौकशी करून कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

पोलिसांनी ३०० लोकांविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत. एक ट्रक, बसेस व इतर खाजगी गाड्या, २ पोलीस व्हॅनची तोडफोड झाली आहे. १८ दुचाकी वाहनांचेही मोठे नुकसान झाले आहे. यात सिसिटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी अटक केलेल्या ४२ जणांना अटक केली असून त्या पैकी १० जणांना जामीन मिळाला आहे, असे आठवले यांनी पत्रकारांना सांगितले. निरपराधांना, विद्यार्थ्यांना यात अडकवू नका. ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत ते गुन्हे मागे घेण्याची विनंती आपण स्वतः मुख्यमंत्र्यांना भेटून करणार असल्याचेही ते म्हणाले.

## २९ डिसेंबरला अण्णाभाऊ साठे विचार साहित्य संमेलन

**परभणी,/प्रतिनिधी:** लाल सेनेच्या वतीने २९ डिसेंबर रोजी जिंतूर रस्त्यावरील महात्मा फुले विद्यालयाच्या प्रांगणात २१वे राज्यस्तरीय अण्णा भाऊ साठे विचार साहित्या संमेलन आयोजित करण्यात आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ तर स्वागताध्यक्ष म्हणून महात्मा फुले एज्यूकेशन सोसायटीचे सह सचिव अजय गव्हाणे यांची निवड करण्यात आली आहे.

रविवारी (दि.०८) महात्मा फुले विद्यालयात आयोजित केलेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी अध्यक्षस्थानी माजी आ. विजयराव गव्हाणे हे होते. याप्रसंगी वाशिमचे शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, लाल सेनेचे कॉ.गणपत भिसे, उत्तम गोरे, प्रकाश बनपट्टे, अशोक उबाळे, अविनाश मोरे, एल.डी.कदम, कोंडीबा जाधव, सिध्दांत भिसे, विकास गोरे, प्रदीप भिसे, अमन कदम यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी संमेलनाध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष यांचा शाल, पुष्पहाराने सत्कार करण्यात आला.

संमेलनाचे आयोजक तथा लालसेनेचे संस्थापक कॉम्रेड गणपत भिसे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, मागील वीस वर्षांपासून शेतकरी, शेतमजूर, दलित, शोषित, उपेक्षित वंचिताची वेदना विचार मंचावर मांडून साहित्या सेवा करत असलेल्या आणि साहित्या सेवेमुळे शेत-बांधावरील वेदना नागर समाजापर्यंत पोचून त्याच्या सोडवणूकीसाठी झटणाऱ्या आणि त्यासाठी नवनवे मार्ग शोधून त्यांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी दलित, उपेक्षित, वंचिताच्या बाजूनं बोलणारे, लिहिणारे, अनुनय करणारे आमच्यासाठी सदोदित प्रेरणास्त्रोत ठरलेले आहेत. आम्हाला प्रेरणा देणारे घटक अधिकाधिक गतिमान व्हावेत यासाठी आम्ही विवीध मार्गाने प्रयतशील आहोत. या प्रयताचा भाग म्हणून मागील २० वर्षांपासून महाराष्ट्रात राज्यस्तरीय अण्णा भाऊ विचार साहित्या संमेलनाची परंपरा सुरू ठेवली असून यावर्षीचे हे २१ वे संमेलन आहे. शहरात संपन्न होणाऱ्या संमेलनात समाजातील सर्व घटकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भिसे यांनी केले आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor



दखल

**मालोजीराव अष्टेकर**

# प्रश्न मराठी अस्मितेचा आहे...

**बेळगाव आणि सीमा भागामध्ये मोठे प्रश्न उपस्थित होत असून मराठीजनांचा ताजा संघर्ष गांभीर्य दर्शवून देणारा आहे. येथील मराठी शाळा, पाठ्यपुस्तके, शाळा-महाविद्यालयातील मराठी मुलांना शिष्यवृत्ती मिळणे, त्यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवणे यासारख्या मागण्यांचा विचार होणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे मराठीजनांची गळचेपी हा मराठी अस्मितेचा प्रश्न आहे. याकडे महाराष्ट्रातले नवे सरकार लक्ष देईल, अशी अपेक्षा आहे.**



बेळगाव आणि इतर सीमा प्रदेशाशी संबंधित प्रश्न आजचा नाही. याला असलेली पृष्ठभूमी अवघ्या जगाला अवगत आहे. १९५६ मध्ये हा सगळा प्रदेश कर्नाटकमध्ये वर्ग करण्यात आला. मुळात हा प्रदेश महाराष्ट्राचा असून तो महाराष्ट्रालाच मिळाला पाहिजे, ही मागणी मांडत बेळगाव, खानापूर, बीदर भाग, कारवार जिल्ह्यातील काही तालुके अशी जवळपास ८६५ गावे महाराष्ट्रात सामील होण्यासाठी लढा देत असून, मागील ६८ वर्षे तो अव्याहत सुरू आहे. येथे बहुसंख्य असूनही मराठी भाषिकांना अन्यायाने कर्नाटकमध्ये डांबण्यात आले असून एका विशिष्ट तत्त्वानुसार या सर्व गावांना महाराष्ट्रात सामील केले पाहिजे, ही आमची मागणी आहे.

सध्या चर्चेत असणारे आम्हा सीमावासीयांचे आंदोलन आणि त्यायोगे विषयाला नव्याने तोंड फुटले असले, तरी आधी उल्लेख केल्याप्रमाणे आजपावेतो आम्ही अशी अनेक आंदोलने केली आहेत. याबाबतच्या मागण्या घेऊन पंतप्रधान, गृहमंत्री यांची भेट घेतली. अनेक शिष्टमंडळे दिल्लीला जाऊन आली. मात्र, कोणीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. हे लक्षात घेऊन २००४ मध्ये आम्ही सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आणि दावा दाखल केला. परंतु, पुरेसे पुरावे देत हा भाग कर्नाटकचा, कानडी आहे हे दाखवणे शक्य नसल्यामुळे कर्नाटक सरकारने हा खटला सतत पुढे पुढे ढकलण्यासाठी प्रयत्न केले. आम्ही वारंवार करीत असलेली आंदोलने लक्षात घेता त्यांनी अलिकडेच बेळगावमध्ये कर्नाटकची विधानसभा बांधली आणि महाराष्ट्रात नागपूरला अधिवेशन घेतात, त्याच धर्तीवर बंगळुरूनंतर इथेही अधिवेशन घेण्यास सुरुवात केली. २००६ पासून हा बदल बघायला मिळत आहे. त्यामुळेच बेळगावमधील या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी या सीमा भागातील नागरिक कर्नाटक सरकारच्या विरोधात मोठा मेळावा आयोजित करतात. २००६ पासून आम्ही असे मेळावे भरवले आणि यशस्वी केले. काही अटी घालून सरकारने त्याला मान्यता दिली. परंतु, अलिकडे बेळगावमध्ये कन्नड रक्षण करणाऱ्या संस्थांच्या नावाखाली काही लोकांच्या संघटना कार्यरत होत आहेत. त्या संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते येथील प्रशासनावर दबाव आणतात आणि त्या प्रभावाने कर्नाटक सरकारचे अधिकारी आमचे मेळावे दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात.

असे सगळे सुरू असताना आम्ही बेळगावकर मंडळी महाराष्ट्रातील विविध पक्षांतील नेतेमंडळींना मेळाव्याचे निमंत्रण देतो. मात्र अलिकडे येथील प्रशासन, पोलिस यंत्रणा कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण पुढे करत आमचे निमंत्रण स्वीकारून तिकडून येणाऱ्या लोकांना प्रवेश बंद करतात. यापूर्वी आर. आर. पाटील, जयंतराव पाटील, हसन मुश्रीफ आदी बडी मंडळी मेळाव्याला हजर राहून, भाषणे करून गेली आहेत. परंतु, आता इथे महाराष्ट्रातून येणाऱ्या नेतेमंडळींना मज्जाव करण्यात येत आहे. खेरीज मेळावा उधळून लावण्याचा प्रयत्नही जोरकसपणे होत आहे. हटकले असता, हा मेळावा महाराष्ट्राच्या हद्दीत जाऊन घ्या, अशी त्यांची भूमिका असते. या सगळ्याला विरोध करण्यासाठी आणि निषेध नोंदविण्यासाठी आम्ही १ नोव्हेंबर रोजीच्या कर्नाटक राज्योत्सवाचा दिन 'काळा दिन' पाळत मोठी सायकल फेरी काढत सभा घेतो. दरवर्षी १७ जानेवारी रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये हुतात्मा झालेल्यांपैकी बेळगावच्या पाच हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहत, अभिवादन करत बंद पाळतो. फेरी काढतो.

१ जून १९५६ रोजी ज्येष्ठ राजकारणी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली इथे कन्नड सक्तीविरोधी आंदोलन जवळपास महिनाभर सुरू होते. ते चिरडण्यासाठी केल्या गेलेल्या गोळीबारात नऊ जण हुतात्मा झाले होते. दरवर्षी १ जून रोजी आम्ही त्यांना आदरांजली वाहतो. इथे आवर्जून सांगावेसे वाटते की, आम्हाला कर्नाटकमध्ये सामील करणाऱ्या केंद्र सरकारच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी आम्ही १ नोव्हेंबरचा 'काळा दिन' पाळतो. त्यामुळेच तसे पाहायचे तर याच्याशी कर्नाटक सरकारचा काहीही संबंध नाही. परंतु, तरीदेखील येथील सरकार आम्हाला अटकाव करण्याचा, बंदी करण्याचा प्रयत्न करते. याच पद्धतीने आताही अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मेळावा आणि मोर्चाच्या स्थळी पोहोचण्यास त्यांनी अटकाव केला. त्यासाठी अर्थातच प्रचंड प्रमाणात पोलिस फौजफाटा ठेवण्यात आला होता. आदल्या दिवशी रात्रीपासूनच एकीकरण समितीच्या बेळगावमधील नेतेमंडळींच्या घराबाहेर पोलिस पहारा ठेवून एक प्रकारे नजरकैदेत ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. सकाळी त्यांना वेगवेगळ्या पोलिस स्टेशनमध्ये नेऊन दुपारनंतर मारीहळ स्टेशनमध्ये एकत्रित करण्यात आले. सामान्य कार्यकर्त्यांना तर मेळाव्याच्या ठिकाणी पोहोचूदेखील दिले नाही.

दुर्दैवाने कर्नाटक सरकारच्या या वृत्तीविरुद्ध महाराष्ट्र सरकार कोणतेही उत्तर देताना दिसत नाही. खरे तर कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना इकडे येण्यास अटकाव करणे मानहानिकारक आहे. त्याचा निषेध नोंदविणे गरजेचे आहे; पण ते होताना दिसत नाही. दुर्दैवाची दुसरी बाब म्हणजे गेली काही वर्षे या सीमा प्रदेशातील नागरिकांसाठी समन्वयक मंत्री नेमण्यात येत आहेत. सुरुवातीला फडणवीस यांच्या कार्यकाळात चंद्रकांत पाटील यांची यासाठी नेमणूक केली गेली होती. त्यानंतर शंभुराज देसाई यांचीही नेमणूक करण्यात आली होती. नंतर छगन भुजबळही त्यांच्यामध्ये आले. परंतु, यापैकी एकही समन्वयक मंत्री बेळगावला आले नाहीत. ही शोकांतिका नव्हे तर दुसरे काय आहे? शेवटी बेळगावमधील लोक मोठ्या आशेने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि समन्वयक मंत्र्यांकडे पाहतात. पण प्रतिसाद मिळत नसल्याने हे लोक प्रचंड नाराज आहेत. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून येथील महागड्या शस्त्रक्रियांसाठी मदत जाहीर केली होती. त्याचे स्वागतच आहे. याच बरोबरीने महाराष्ट्रातील मंत्र्यांनी सीमा भागात सुरू असणाऱ्या आमच्या लढ्याकडे गांभीर्याने पाहणे, आम्हाला खंबीर पाठबळ देणेही गरजेचे आहे. त्यांनी लक्षात घ्यायला हवे की, हा लढा एखादी शिष्यवृत्ती, आरक्षण वा तत्सम वैयक्तिक लाभासाठी नसून सीमा भागातील मराठी संस्कृती, मराठी भाषा, मराठी लिपी आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्यासाठी आहे. महाराष्ट्र सरकार याकडेच दुर्लक्ष करत असेल तर दुसरे दुर्दैव नाही.

आमच्यापुढे बरेच मोठे प्रश्न आहेत. या सीमा भागामध्ये बहुसंख्येने असलो, तरी संपूर्ण कर्नाटकचा विचार करता आम्ही अल्पसंख्य ठरतो. असे असताना भारतीय राज्यघटनेने अल्पसंख्यकांना दिलेले अधिकारही आम्हाला मिळत नाहीत. ते सोयीस्कररीत्या डावलले जातात. कर्नाटक सरकार यासंदर्भात नोटिफिकेशन काढत असल्याचे सांगते खरे; मात्र जवळपास २० वर्षांपासून ते प्रसिद्धच केले जात नाही. संबंधित पत्रके मराठीत मिळायला हवीत, दुकानांवरील बोर्ड मराठीत हवे, फलक मराठी हवेत यासारख्या साध्या गोष्टींचीही अंमलबजावणी होत नाही. उलट इथे कानडीची सक्ती केली जाते. या सगळ्याचा असंतोष इथल्या मराठीजनांमध्ये आहे. हे सगळे लक्षात घेता महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी हा प्रश्न तडफेने मांडणे गरजेचे आहे. आपले खासदार महाराष्ट्रातील एखाद्या भागातील प्रश्न मांडताना दिसणारी तडफ या प्रश्नीही दिसायला हवी. सध्या तर महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे. गेल्या १० वर्षांमध्ये आमच्या मागण्यांसंदर्भात पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्याबरोबर चर्चा झालेली नाही. हे लक्षात घेऊन नव्या सरकारने ही चर्चा सुरू करणे आवश्यक आहे.

दुसरी बाब म्हणजे सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नासंदर्भात दावा दाखल केला असला, साक्षीदारांची निवड झाली असली आणि पुरावे तयार असले, तरी दाव्याची सुनावणीच ठप्प झाली आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये दावा बोर्डवर आलेलाच नाही. याबाबतही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी हा प्रतिष्ठेचा प्रश्न मानून लक्ष घालणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे सीमाप्रश्नी नेमलेल्या वकिलांना दावा लवकरात लवकर सुरू करण्यासाठीही आवश्यक ते साहाय्य केले पाहिजे. आधी यासाठी हरीश साळवे यांच्यासारखे ख्यातनाम वकील नेमले होते. परंतु वेळेत काम होत नसल्यामुळे त्यांनी यातून लक्ष काढून घेतले. म्हणूनच पुन्हा एकदा त्यांना विनंती करून हा दावा नेटाने चालविण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील मराठी माणसांप्रमाणेच आम्हा सामान्य नागरिकांनाही न्याय मिळावा, ही रास्त आणि वाजवी अपेक्षा आहे. येथील मराठी शाळा, पाठ्यपुस्तके, शाळा-महाविद्यालयांतील मराठी मुलांना शिष्यवृत्ती मिळणे, काही जागा राखीव ठेवणे यासारख्या मागण्यांचाही विचार होणे गरजे आहे. आम्ही कानडी शिकत नसल्यामुळेही मोठी अडचण झाली आहे. या सगळ्याकडे नवे सरकार लक्ष देईल, अशी अपेक्षा आहे.

(लेखक बेळगावचे माजी महापौर असून, महाराष्ट्र एकीकरण समितीचे सरचिटणीस आहेत.)

विश्वसंचार

**प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

# पाच दशकांच्या छळयुगाचा अंत!



**सीरियामधील बंडखोरांनी वायव्येकडील इडलिबमधील तळावरून अचानक मोहीम सुरू केली आणि राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद यांची जुलमी राजवट संपुष्टात आली. त्यांच्यामुळे सीरियात गृहयुद्ध सुरू झाले; त्यात पाच लाखांहून अधिक लोक मारले गेले आणि सहा लाख लोक विस्थापित होऊन निर्वासित झाले. असद यांनी रशिया आणि इराणच्या मदतीने सत्ता टिकवली. मात्र आता त्यांच्या राजवटीचा निर्णायक पाडाव झाला आहे.**

एका पंधरवड्यापूर्वी बंडखोरांनी सीरियाच्या वायव्येकडील इडलिबमधील तळावरून अचानक मोहीम सुरू केली, तेव्हा सीरियातील कोणीही बशर अल-असदच्या पतनाबद्दल विचारही करत नव्हते. वडील हाफेज अल-असद यांच्या निधनानंतर बशर-अल-असद २००० मध्ये सत्तेवर आला. हाफेजने २९ वर्षे सीरियावर राज्य केले. त्याचा राज्यकारभारही त्याचा मुलगा असदच्या शासनाप्रमाणे हुकूमशाहीचाच होता. म्हणजेच बशर-अल-असद यांना दमनकारी राजकारणाचा वारसा लाभला होता. असद आपल्या वडिलापेक्षा वेगळा वागेल, अशी अपेक्षा होती; पण ही आशा फार काळ टिकू शकली नाही. २०११ मध्ये सीरियाच्या राजवटीच्या विरोधात शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्यांना निर्दयपणे दडपून टाकणारा माणूस म्हणून बशर अल-असद नेहमीच लक्षात राहिला. त्याच्या निर्णयामुळे सीरियामध्ये गृहयुद्ध सुरू झाले; त्यात पाच लाखांहून अधिक लोक मारले गेले आणि सहा लाख लोक विस्थापित होऊन निर्वासित झाले. बशर अल-असद याने रशिया आणि इराणच्या मदतीने विरोधकांना चिरडून आपली सत्ता टिकवली. रशियाने सीरियामध्ये जोरदार हवाई हल्ले केले. इराणने आपले लष्करी सल्लागार सीरिया आणि हिजबुल्लाहला पाठवले तर शेजारच्या लेबनॉनमध्ये त्याला पाठिंबा असलेल्या सशस्त्र गटाने आपले प्रशिक्षित सैनिक सीरियामध्ये लढण्यासाठी पाठवले. यावेळी मात्र स्वतःच्या समस्यांमध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांनी सीरियाला वाऱ्यावर सोडून दिले. या पृष्ठभूमीवर विरोधक 'हयात तहरीर अल-शाम' (एचटीएस) च्या नेतृत्वाखालील बंडखोरांना रोखण्यास सीरियन सैन्य अक्षम होते. म्हणूनच त्यांनी फारशा विरोधाशिवाय राजधानी दमास्कस तसेच देशातील दुसरे सर्वांत मोठे शहर अलेप्पो ताब्यात घेतले तर असद यांनी रशियात आश्रय घेतला.

दमास्कस हे असदच्या सत्तेचे केंद्र. आता सीरियातील असद कुटुंबाची पाच दशकांची राजवट संपुष्टात आल्याने या प्रदेशातील सत्तेचा समतोल बदलू शकेल. सीरियातील घटनेनंतर इराणला मोठा फटका बसत आहे. बशर अल-असदच्या शासनाखालील सीरिया हा इराण आणि हिजबुल्लाह यांच्यातील संबंधाचा एक भाग होता. शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा पुरवण्यासाठी ते अत्यंत महत्त्वाचे होते. इस्रायलबरोबरच्या युद्धानंतर हिजबुल्लाह खूपच कमकुवत झाली आहे आणि तिचे भविष्य अनिश्चित आहे. हुथ हा आणखी एक इराणसमर्थित गटदेखील येमेनमध्ये हवाई हल्ल्यांचे लक्ष्य बनला आहे. या गटांशिवाय इराकमध्ये कार्यरत असलेले सशस्त्र गट आणि गाझामधील हमाससारख्या गटांचे गंभीर नुकसान झाले आहे. सीरियातील नवीनतम हल्ला तुर्कस्तानच्या आशीर्वादाशिवाय शक्य झाला नसता, असे काहींना वाटते. असे असले, तरी काही सीरियन बंडखोर गटांना पाठिंबा देणाऱ्या तुर्कस्तानने 'एचटीएस'ला पाठिंबा नाकारला आहे. काही काळापासून तुर्कस्तानचे अध्यक्ष एर्दोगान हे बशर अल-असद यांच्याशी संघर्षावर मुत्सद्दी तोडगा काढण्यासाठी चर्चेत गुंतण्यासाठी दबाव आणत आहेत. त्यामुळे सीरियन निर्वासितांना परत येण्याची परवानगी मिळेल, असा त्यांचा होरा होता; पण असद यांनी तसे करण्यास नकार दिला. आज किमान तीन दशलक्ष सीरियन निर्वासित तुर्कस्तानमध्ये आहेत. एचटीएसची मुळे 'अल-कायदा'शी जोडलेली आहेत आणि त्यांचा भूतकाळ अतिशय हिंसक आहे; मात्र गेल्या काही वर्षांपासून या गटाला पुन्हा राष्ट्रवादी शक्ती म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे.

त्याच वेळी सीरियामध्ये नाट्यमय शासनबदलामुळे राजवटीच्या शीर्षस्थानी एक पोकळी निर्माण होऊ शकते. त्यामुळे अराजकता वाढून अधिक हिंसाचार होऊ शकतो. एचटीएसने अध्यक्ष बशर अल-असद याच्या राजवटीचा पाडाव आणि दमास्कस ताब्यात घेण्याची घोषणा केल्यानंतर त्याचा म्होरक्या अबू मुहम्मद अल-जुलानीची ओळख आणि भूमिकेची चर्चा सुरू झाली आहे. जुलानीचे खरे नाव अहमद हुसैन अल-शरा आहे. त्याला अबू मुहम्मद अल-गोलानी म्हणूनही ओळखले जाते. जुलानीने आपल्या कारकीर्दीची सुरुवात इराकमधील 'अल-कायदा'मधून केली होती. त्याने नंतर अल-कायदाचा नेता अयमान अल-जवाहिरी याच्याशी निष्ठेची शपथ घेतली. २०१२ मध्ये जुलानीने अल-नुसरा फ्रंट नावाची संघटना स्थापन केली आणि असद सरकार उलथून टाकण्याची शपथ घेतली. यानंतर जुलानीच्या नेतृत्वाखाली 'अल-नुसरा फ्रंट'ने संघटनेचे नाव बदलून 'जभत फतह अल-शाम' असे केले. त्यानंतर २०१७ मध्ये ते एचटीएस असे करण्यासाठी इतर कट्टरवादी गटांमध्ये विलीन झाले. 'एचटीएस' आता सीरियातील सर्वात प्रभावशाली बंडखोर गटांपैकी एक आहे आणि त्याच्यावर थेट जुलानीचे नियंत्रण आहे. अबू मुहम्मद अल-जुलानीला २०१३ मध्ये अमेरिकेने 'विशेष नियुक्त जागतिक दहशतवादी' म्हणून घोषित केले होते. यासोबतच जुलानीवर १० दशलक्ष डॉलर्सचे इनाम ठेवण्यात आले होते. २०१३ मध्ये संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने त्याचा समावेश प्रतिबंधित दहशतवाद्यांच्या यादीत केला होता.

असदचे सैन्य युद्धामुळे कमकुवत झाले होते आणि त्यांचे बरेचसे सैनिक लढायला तयार नव्हते. रशिया, इराण आणि हिजबुल्लाहसारखे मित्र यावेळी मदत देऊ शकले नाहीत. कारण ते स्वतःच्या संघर्षात मग्न होते. सीरियामध्ये जुलानीने नव्या युगाची सुरुवात जाहीर केली आहे. या यशामुळे 'एचटीएस'ने सीरियामध्ये आपली पकड मजबूत केली आहे. असद राजवटीचे पतन हा रशिया आणि इराणसाठी मोठा धक्का मानला जात आहे. आता जुलानीचे पुढचे पाऊल काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तो आपली शक्ती बळकट करण्यावर भर देतो की, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि सुरक्षेतील नवी आव्हाने मांडतो हे पाहायचे आहे. इस्लामिक बंडखोरांच्या ताब्यात गेल्याने सीरियाच्या भविष्याबद्दल जगभरात अनिश्चितता आणि चिंता आहे. सत्तापालटानंतर सीरियामध्ये दहशतीचे वातावरण आहे. सीरियावर ५३ वर्षांहून अधिक काळ अल-असद कुटुंबाची सत्ता आहे. सीरियन लोकांनी सुमारे १४ वर्षांपूर्वी अशीच शांततापूर्ण निदर्शने केली; परंतु त्यांना हिंसाचाराचा सामना करावा लागला. त्याचे रूपांतर रक्तरंजित गृहयुद्धात झाले. अशा स्थितीत आठवडाभरापूर्वीपर्यंत सीरियातील बहुतांश भागांवर ताबा मिळविणाऱ्या अल-असद कुटुंबाचा इतक्या लवकर अंत कसा झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सीरियन आर्मीने घोषित केले आहे की, ते काही प्रांतांमध्ये आणि जवळच्या स्विडामध्ये आपली उपस्थिती मजबूत करत आहे; परंतु हे सर्व व्यर्थ ठरले आहे.

दरम्यान, 'सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राईट्स'ने दिलेल्या माहितीनुसार सीरियन सैन्याने इस्रायलच्या ताब्यात असलेल्या गोलान हाईट्सजवळील कुनेत्रातील स्थानांवरून माघार घेतली आहे. सीरिया आधीच संघर्ष करत होता. त्याची अर्थव्यवस्था कोलमडत होती. सरकारविरोधी घटक कॅप्टॅगॉन या सायकोॲक्टिव्ह ड्रग्जच्या अवैध व्यापारातून देशभर पैसे कमवत होते. असद संपूर्ण देशात अत्यंत तिरस्काराचा धनी झाला होता. कारण लोकांचे जगणे कठीण होत होते. यामध्ये सीरियन आर्मीच्या सैनिकांचाही समावेश होता. ते सरकारच्या या वृत्तीवर खूश नव्हते. बहुतेक सैनिकांना अल-असदसाठी लढायचे नव्हते. बंडखोर पुढे येण्याआधीच सैनिक आणि पोलिस अधिकारी आपली पोस्ट सोडून, शस्त्रे समर्पण करून पळून जात होते. अल-असदची राजवट कमकुवत होती. ती रशिया आणि इराणच्या लष्करी मदतीवर अवलंबून होती; परंतु रशिया युक्रेनविरोधातील युद्धात आणि इराण इस्रायलविरोधातील युद्धात गुंतला होता. त्यामुळेच खचलेल्या सीरियन सैन्याच्या मदतीसाठी ते पुढे येऊ शकले नाहीत. अल-असदच्या जाण्याच्या घोषणेनंतर दमास्कस, होम्स आणि इतर सीरियन शहरांमध्ये उत्सव साजरा करण्यात आला. क्रांतीचा झेंडा फडकवणाऱ्या गर्दीत लोक आनंदाने टाक्यांवर चढले. काही ठिकाणी लोकांनी अल-असदचे वडील हाफेज यांचे पुतळे पाडले. मशिदींमध्ये जमाव एकत्र प्रार्थना करण्यासाठी आणि सार्वजनिक चौकांमध्ये उत्सव साजरा करण्यासाठी जमले. असदविरोधी घोषणा देत आणि कारचे हॉर्न वाजवत लोकांनी आनंदोत्सव साजरा केला. आता सीरिया बदलाच्या एका नव्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे.

(लेखक आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक आहेत.)

रविवारची पत्रे

## ऑनलाईन फसवणुकीचे वाढते प्रकार चिंताजनक

देशात तसेच राज्यात इंटरनेटच्या वापरकर्त्यांची संख्या ज्या गतीने वाढत आहे त्यापेक्षा जास्तच गतीने सायबर फसवणुकीचे प्रमाण कमी होण्याऐवजी त्यात अधिक वाढ झाल्याचे दिसते. मोबाईल किंवा लॅपटॉप यावर चुकीने केलेल्या एका क्लिकमुळे माणसांचे बँक खाते पूर्णतः लुटले जाण्याच्या घटना या अगदी रोज घडत असतात. सामान्य माणसांची फसवणूक साधारणतः त्याच त्याच पद्धतीने होताना आढळते. वास्तविक पाहता अशी फसवणूक टाळण्याचे उपाय सरकार आणि सामाजिक संस्था सतत ओरडून सांगत असतात. यासाठी फलक लावतात, ब्लॉग लिहितात, युट्युबवर व्हिडीओ टाकतात. म्हणजे ज्या ज्या पद्धतीने लोकांना किमान सावध करणे किंवा तेवढ्यापुरते साक्षर करणे शक्य होऊ शकेल ते सगळे उपाय अमलात आणले जातात. फोनवर ओटीपी किंवा पासवर्ड सांगू नका. एकच पासवर्ड सगळ्या ठिकाणी वापरू नका. तुमची वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींना शेअर करू नका. मोबाईल स्क्रीन लॉक करण्यासाठी खूप साधे पासवर्ड वापरू नका. संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका असे मोठे आवाहन सातत्याने केले जाते. बँक कधीही तुमची माहिती फोनवर विचारत नाही या इशाऱ्याचाही समावेश असतो. याशिवाय अनेक पद्धतीने फसवणूक करण्याचे नवनवे मार्ग शोधून काढले जातात. त्याविषयी देखील तज्ज्ञ वारंवार माहिती प्रसिद्ध करतात. तरीही लोक त्याच त्याच चुका कशा करीत असतात.

सायबर निरक्षरता हे त्याचे एक प्रमुख कारण मानले जाते. ही बाब तेवढीच खरी ठरते. तथापि ज्या माध्यमाच्या मदतीने आर्थिक व्यवहार करायचे त्याची आवश्यक माहिती करून घेणे किंवा साक्षर होणे ही लोकांचीदेखील जबाबदारी नाही का? अशी फसवणूक झाली तर तक्रार कुठे करायची हे किती जणांना माहीत असते. सरकारी पोर्टल आहे, आज अनेक ॲप कार्यरत आहेत. पण त्याचा योग्य वापर किती जण करू शकत असतील. ते माहीत करून आणि शिकून घेणे आवश्यक असते, असा प्रयत्न किती जण करतात. सध्या राज्यातील विविध भागांत ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. याबाबत सायबर विभाग आणि पोलिस विभागाच्यावतीने सातत्याने जनजागृती करूनही परिस्थितीत अजूनही सुधारणा झाली नाही. उलट असे प्रकार वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळते. झटपट पैसे कमावण्याचे कोणतेही मार्ग नसतात याचा विसर लोकांना पडला आहे. कुठलेही कष्ट न करता पैसे कमावण्याची हाव यामागचे प्रमुख कारण आहे. आज लाखो लोकांना नोकरीची गरज आहे. पण त्यासाठीचे विश्वासार्ह स्रोत्र माहीत करून घेणे ही ज्याची त्याची जबाबदारी असते. या बाबीचा लोकांनी विचार करण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

●● ●●

## रस्ते अपघातातील मृत्यू : चालकांचे प्रशिक्षण आवश्यक

मुंबई इथे 'बेस्ट'च्या सुसाट वेगाने धावणाऱ्या बसच्या धडकेने ६ नागरिक मृत्युमुखी पडले तर सुमारे ५० नागरिक जखमी झाले. अपघात झाला ती बस विजेवर चालणारी होती. विजेवर चालणाऱ्या बसवर केवळ तीन दिवस सराव केल्यावर चालकाला नियत फेरीवर पाठविण्यात आले असे बातमीत नमूद असून चालकाला नवीन पद्धतीची बस चालविण्याचे प्रशिक्षण किती दिवस द्यावे? असा मुद्दा या निमित्ताने उपस्थित झाला आहे. अपघात संदर्भात दुसरा मुद्दा रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या पदपथावरील अतिक्रमणांचा आहे. जर रस्त्यालगतच्या पदपथावर अतिक्रमणे नसती तर मरण पावलेल्यांची संख्या तसेच जखमींची संख्या मर्यादित राहिली असती असाही दावा करण्यात येतो. एक निष्कर्ष असा की अतिक्रमण असलेल्या रस्त्यावर अपघात झाला तर त्याची भीषणता अधिक असते. रस्ते अपघात संदर्भात केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत दिलेली माहिती काळजी वाढविणारी आहे. रस्ते अपघातात सुमारे १ लाख ८० हजार व्यक्तींचा मृत्यू मागील एका वर्षात झाला असून अपघातांच्या अनेक कारणांपैकी वाहनांचा वेग हे प्रमुख कारण असल्याचे नमूद केले. तात्पर्य असे की रस्ते गुळगुळीत केले तरी वाहन अपघातांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. अपघातप्रवण क्षेत्रात सरकारने काही सुधारणा करूनही अपघात संख्येत घट झालेली नाही. म्हणजे मूळ कारण हे वाहन चालकांची मानसिकता हेच आहे. अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या वयोगटाच्या विचार केल्यास ३४ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्यांची संख्या अधिक आहे. जो वयोगट कुटुंबाचा आधार आहे तो आधार अचानक निखळल्याने कुटुंबावर किती तीव्र आघात होत असेल याचा तर्क करता येतो.

वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती म्हणजे परवाना कसा दिला जातो याची प्राथमिक माहिती जाणून घेणे आवश्यक ठरेल. वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावरच वाहन परवाना दिला जातो. प्रथम तीन महिन्यांकरिता शिकाऊ परवाना दिला जातो. त्यानंतर कायमस्वरूपी परवाना जातो आणि वयाचे ४० वर्षे होईतो हा परवाना वैध असतो.

राज्य परिवहन महामंडळातील चालक नियुक्तीची प्रक्रिया अभ्यासावी अशीच आहे. अवजड वाहन चालविण्याचा परवाना काढून ५ वर्ष पूर्ण झालेले चालक परिवहन महामंडळात चालक पदासाठी अर्ज करू शकतात. लेखी, तोंडी परीक्षा झाल्यावर निवड झालेल्या चालकाला ९० दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. प्रवासी बसवर काम दिले जाते. रा. प. मधील नवीन चालकांना प्रशिक्षण देण्यासाठी स्वतंत्र बस असते. बसमधील ५० प्रवाशांचे जीवन बस चालकाचे हातात असते हा मुद्दा या प्रशिक्षणात शिकाऊ चालकांचे मनावर ठसविला जातो. राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी कोणत्याही चालकाची, वाहकाची तपासणी करू शकतात किंवा दंडात्मक कार्यवाही करू शकतात हा धाक देखील असतो. याचा परिपाक असा की स्वैर वागण्यावर बंधने येतात. या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम असा की राज्य परिवहन महामंडळाच्या बस गाड्यांचे अपघात तुलनेने नगण्य आहेत.

वाहन चालकाला धाक असेल तर वाहन चालक नियंत्रणात राहतो असा निष्कर्ष निघतो. वाहतूक पोलिस व परिवहन खाते म्हणजे आरटीओ हे वाहन चालकांना नियंत्रित करण्याचे कार्य करीत असतात. मात्र पोलिस, आरटीओ यांची प्रतिमा भ्रष्टाचारी असल्याने पैसे फेकून किंवा दडपण आणून सुटका करून घेण्याची वाहन चालकांची मानसिकता झाली आहे. देशात वाहनांची संख्या इतक्या प्रमाणात वाढली आहे की पोलिस, आरटीओ यांची संख्या त्या तुलनेत पुरेशी नाही. स्वयंचलित कॅमेरे बसवून दंड करणे यासारखे (कृत्रिम बुद्धिमत्ता) पर्याय असले तरी त्याला देखील मर्यादा आहेत.

त्यामुळे वाहनचालकांनी स्वयंशिस्तीचे पालन करणे याला पर्याय नाही.

वाहनचालकांना जी वाहन अनुज्ञप्ती दिली जाते ती मर्यादित कालावधीची जशी ५ किंवा १० वर्ष कालावधीची असावी. वाहन चालकाने एक दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यावरच वाहन अनुज्ञप्ती पुढील कालावधीसाठी वाढविण्यात यावी. या प्रशिक्षणात सुरक्षा उपयांबावत बौद्धिक व प्रात्यक्षिके यांचा समावेश असावा. अपघातात ज्यांना अपंगत्व आले असेल अशा व्यक्तीच्या मुलाखती चलचित्राद्वारे दाखवून भलते धाडस किती महाग पडू शकते हे वाहन चालकांच्या मनावर प्रतिबिंबित करण्याचा प्रयास असावा.

वाहन चालकांचे प्रशिक्षण करायचे झाल्यास देशपातळीवर प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे जाळे निर्माण करावे लागेल. अपघात कमी करायचे असल्यास वाहन चालकांचे प्रशिक्षण हाच त्यावर प्रभावी उपाय ठरेल.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

●● ●●

## भाजपामधील इनकमिंग थांबवा

'उद्धवजी, आता तरी आत्मचिंतन करा', हे वाचकपत्रेमधील भालचंद्र ठोंबरे यांचे पत्र वाचले. त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याबाबत सर्व मुद्दे मांडले आहेत. त्यांना दिलेला आत्मपरीक्षणाचा सल्लाही योग्यच आहे. तथापि त्यांना पुन्हा एकदा हिंदुत्वाची कास धरण्याचा आणि त्यामुळे त्यांना 'भरभराटीचे' दिवस येतील हे म्हणणे पटले नाही. याची अनेक कारणे आहेत.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे 'हिंदुहृदयसम्राट' हे बिरूद काढून त्यांना 'जनाब' म्हणण्यापासून ते लोकसभा निवडणुकीत आम्ही मुस्लिम मतांमुळे जिंकलो, असे म्हणण्यापर्यंत उबाठांची मजल गेली आहे. हिंदुत्व ही काही सत्ता मिळवण्याची गोष्ट नाही की हवी तेव्हा स्वीकारावी आणि नको तेव्हा फेकून द्यावी. महत्त्वाचे म्हणजे, उद्धव ठाकरे यांचे असे काय कर्तृत्व आहे की महाराष्ट्राला, देशाला फायदा होईल? शिवसेनाप्रमुखांचे पुत्र याशिवाय त्यांची काय पात्रता आहे? आजवर मुंबई/महाराष्ट्राच्या विकासात त्यांनी असा कोणता हातभार लावला आहे की त्यांचे योगदान विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे? उलट मला अर्थसंकल्पातले काहीही कळत नाही आणि शेतीतलेही काही समजत नाही, अशी कबुलीही त्यांनी दिली आहे.

२०१९ मध्ये मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपोटी त्यांनी भाजपाबरोबरची ३० वर्षांची अभेद्य युती तोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर आघाडी करून जनादेशाला पायदळी तुडवले, हे जनता कधीच विसरणार नाही. मविआचा अडीच वर्षांचा चंगेझखानी कारभार महाराष्ट्रातील जनतेने सोसलाही आहे. तेव्हा स्वार्थी, संधिसाधू, विश्वासघातकी आणि सत्तापिपासू असलेल्या उबाठांना घेण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

अजाणतेपणी झालेल्या चुका क्षम्य असतात पण जेव्हा हेतुपुरस्सर, स्वार्थापोटी, सत्तेसाठी, समजून-उमजून, जाणीवपूर्वक चुका केल्या जातात तेव्हा त्या क्षम्य ठरत नाहीत. महाराष्ट्रातील जनतेने उबाठा-काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांना स्पष्टपणे नाकारले आहे. त्यांना सत्तेपासून दूर ठेवले आहे. तेव्हा महायुतीनेही जनादेशाच्या विरोधात न जाता, कोणताही उदारपणा न दाखवता आणि कोणतीही तडजोड न करता निरुपयोगी, उपद्रवी, संधिसाधू आणि दगाबाज नेते आणि पक्षांबरोबर पुन्हा समझोता करू नये. तसे झालेच तर ते महायुतीसाठी आत्मघातकी ठरेल, यात शंकाच नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

## भाषेचे पुनरुज्जीवन आवश्यक!

भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती ।

याचा अर्थ असा आहे, सर्व भाषांमध्ये देववाणी संस्कृत ही प्रमुख भाषा असून ती मधुर आणि दिव्य आहे. संस्कृत भाषेतच वेद, उपनिषदे, पुराणे, दर्शनशास्त्रे लिहिली गेली आहेत. ऋषींनी विविध विषयांवर लिहिलेले ग्रंथ, आयुर्वेदाचे मूळ ग्रंथ हे देखील संस्कृतमध्येच आहेत. ईश्वरप्राप्तीसाठी सांगितलेल्या चौदा विद्या आणि चौसष्ट कला याविषयीची माहिती संस्कृतमध्येच लिहिलेली आहे. अशी या देववाणी संस्कृतची महती आहे.

परंतु परधर्मीयांच्या आक्रमणानंतर नालंदा, तक्षशिला या प्राचीन विद्यापीठांचा विध्वंस झाला. संस्कृतमधील विपुल ग्रंथसंपदा नष्ट झाली. कालांतराने याच भाषेला आपल्या देशात मृतभाषा असे देखील संबोधण्यात आले. एकीकडे आपल्या देशात या भाषेला मृत ठरवण्यात आले, तर दुसरीकडे अन्य देशांमध्ये मात्र तिचा अभ्यास करण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की सध्याच्या संगणक युगात संगणकीय भाषेला संस्कृत चांगल्या प्रकारे आणि अचूकतेने लागू पडते, हे सिद्ध झाले. यातून संस्कृत भाषेचे श्रेष्ठत्व लक्षात येते. आपल्या देशात अन्य भाषांच्या प्रसारासाठी, विकासासाठी लाखोंचे अनुदान दिले जाते. परंतु आपली संस्कृती टिकवणाऱ्या संस्कृत भाषेच्या प्रसारासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान किंवा सवलत दिली जात नाही. अशा स्थितीत जेव्हा विधानसभेत आमदारांनी संस्कृत भाषेत शपथ घेतली, तेव्हा एक आशेचा किरण दिसला. संस्कृत भाषा आजपर्यंत टिकून आहे, ती त्यातील चैतन्यामुळे! ज्या भाषेत एकही शिवी नाही, ती भाषा जर आपली बोलीभाषा बनली, तर निश्चितच त्यातील चैतन्यामुळे सकारात्मक वातावरण निर्माण होईल. त्यामुळे केवळ शपथ संस्कृतमध्ये घेऊन तिथेच न थांबता तिचा वापर शाळा, नोकरी, व्यवसाय, प्रशासनापर्यंत होण्यासाठी सतत प्रयत्न व्हायला हवा. तरच आपली संस्कृत भाषा आणि संस्कृती देखील टिकेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Made with Xodo PDF Reader and Editor



## क्राईम वृत्त...



### आ. रमेश कराड यांचा सत्कार

**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले. भारतीय जनता पार्टीचे नेते माजी जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांचे लातूर येथील संवादया त्यांच्या संपर्क कार्यालय येथे माजी नगराध्यक्ष बसवराज अण्णा बागबंदे, नगरसेवक दत्ता पाटील यांच्या समवेत आ. रमेश कराड यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले.



### बाळासाहेब किसवे यांचा सत्कार

**अहमदपूर, दि.१५ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य शेळी मेंढी पालन महामंडळाचे उपाध्यक्ष, राज्यमंत्री दर्जा प्राप्त असलेले बाळासाहेब किसवे यांचा अहमदपूर मध्ये नुकताच सत्कार करण्यात आला. महायुती मधील शिवसेना नेते तथा राज्यमंत्री दर्जा प्राप्त असलेले बाळासाहेब किसवे हे प्रथमच अहमदपूर दौऱ्यावर आले होते. अहमदपूरहून नागपूरकडे जात असताना बाळासाहेब किसवे व शिवसेनेचे प्रदेश प्रवक्ते योगेश केदार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सदरील सत्कार सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी पंचायत समितीचे सदस्य रामभाऊ नरवटे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, राजकुमार मुकनर, आनंत होळकर, सुदर्शन हामने, अनंत देवकते, मंगेश पोले, दिनकर बडूरे, गणेश कासनाळे, रवी देवकते, गणेश नरवटे, ओम नरवटे, राजू चिगळे यांच्या सह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रदेश प्रवक्तेपदी राजकुमार सस्तापुरे

**वलांडी, दि.१५ डिसेंबर -**

तालुक्यातील ईस्मालवाडी येथील भुमिपूत्र राजकुमार सस्तापुरे गेल्या तीस वर्षांपासून शरद जोशींच्या



नेतृत्वात शेतकरी संघटनेत अत्यन्त प्रतिकुल परस्थिती असतानाही संघटनेत टिकून काम करून शेतकरी चळवळच्या पडझडीच्या काळात लातूर जिल्हाप्रमुखाची जबाबदारी घेऊन शेतकऱ्यांसाठी अनेक आंदोलन करून शेतकरी चळवळ जिवंत ठेवण्याच काम केले. याच कामाची दखल घेऊन भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकेत यांच्या आदेशावरून भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय महासचिव राजवीर सिहं जादौन यांनी १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय कार्यालयातून निवडीचे पत्र देऊन निवड जाहीर केली आहे. राजकुमार सस्तापुरे सारखा एका सामान्य कुटूंबातील सामान्य कार्यकर्त्यांला भारतीय किसान युनियनने महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता ही जबाबदारी दिल्यामुळे शेतकरी चळवळीत व सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या त्याच्या मित्र परिवारात आनंदाच वातावरण आहे. व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



### केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न

**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

केंद्रीय प्राथमिक शाळा, कोदळी (ता. उदगीर) येथे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी केंद्रातून अनेक शाळा या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. त्यात शांतिनिकेतन विद्यालयातील प्रयोगाचे नाव होते दोन आरशामध्ये विशिष्ट कोण केला असता मिळणाऱ्या प्रतिमांची संख्या पाहणे. हा प्रयोग यशस्वीरित्या करून दाखवला. माध्यमिक गटातून शांतिनिकेतन विदयालयाने पहिला क्रमांक पटकावला. प्रयोग करणाऱ्या विद्यार्थीनी संध्या दत्ता जाधव व अंकिता तानाजी गादगे यांनी उत्कृष्ट पद्धतीने प्रयोगांचे सादरीकरण केले. विज्ञान विषयांचे शिक्षक भूरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना ५३ कोटींची नुकसान भरपाई

## औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांना मदत; आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश...

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि.१५ डिसेंबर -**

ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे औसा मतदारसंघातील किल्लारी, लामजना, भूतमुगळी, कासार बालकुंदा, मदनसुरी व कासार सिरसी या मंडळांमधील ३९ हजार हेक्टरातील पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानग्रस्त भागाची आमदार अभिमन्यू पवार यांनी पाहणी करून झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे केले होते. या नुकसानीच्या भरपाईसाठी सरकारकडे प्रस्ताव दाखल करुन सातत्याने याचा पाठपुरावा केला होता. यामुळे औसा मतदारसंघातील सात मंडळांमधील अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी ५३ कोटीं रुपयांची नुकसान भरपाई मंजूर झाली आहे.



यावर्षी लातूर जिल्ह्यासह औसा मतदारसंघातील काही भागात अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले होते. यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळून मदत व्हावी. यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी अतिवृष्टीने बाधीत भागाचा दौरा केला. व पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी म्हणून शासनाकडे पाठपुरावा केला होता. यानंतर शासनाकडून औसा मतदारसंघातील किल्लारी, लामजना, भूतमुगळी, कासार बालकुंदा, मदनसुरी व कासार सिरसी या मंडळांमधील ३९ हजार हेक्टर कृषिक्षेत्राच्या नुकसानपोटी ५३ कोटीं रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या औसा मतदारसंघातील मातोळा, बेलकुंड व उजनी महसूल मंडळांमधील शेतकऱ्यांना ४० कोटींची नुकसान भरपाई यापूर्वीच वितरित करण्यात आली आहे.



**शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे...**

महायुतीचे सरकार शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून काम करीत असून नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत केली आहे. यावेळीही अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना सरकारने आर्थिक दिलासा दिला आहे. औसा मतदारसंघातील किल्लारी, लामजना, भूतमुगळी, कासार बालकुंदा, मदनसुरी व कासार सिरसी या मंडळांमधील सुमारे ३९ हजार हेक्टर कृषिक्षेत्राचे नुकसान पोटी ५३ कोटीं रुपये व यापुर्वी याच हंगामात ४० कोटी असा एकुण ९३ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर केली आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आ. पवार यांनी आभार मानले आहेत.

यामुळे खरीप २०२४ हंगामातील नुकसानीपोटी औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांना एकूण ९३ कोटीं रुपयांची नुकसानभरपाई मिळवून देण्यात यश आले आहे.

# पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार समाजसेविका ममता सिंधुताई सपकाळ यांना जाहीर

## हिरकणी पुरस्कार संयोजक समिती तुळजापूर यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.१५ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथे धाराशिव जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील प्रति वर्षी नऊ कर्तृत्ववान महिलांना गौरव करण्यासाठी मागील पाच वर्षापासून जिल्हास्तरीय हिरकणी पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जात होते. यंदा प्रथमच राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सोहळा शक्तीपीठ तुळजाई नगरीत आयोजित करून या पुरस्काराची सामाजिक व वैचारिक उंची वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे अशी माहिती मुख्य संयोजक अनिल आगलावे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

महाराष्ट्राची जेष्ठ समाजसेविका पद्मश्री

अनाथांची माई सिधुताई सपकाळ यांच्या कन्या प्रसिद्ध गजलकार ममता सपकाळ यांना पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार जाहीर झाला आहे. पुढील महिन्यात, जानेवारी २०२५ मध्ये मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत हा पुरस्कार सपकाळ यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

पुजारी नगर फाऊंडेशनच्या माध्यमातून हा पहिलाच राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार देण्याची घोषणा फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी यांनी केली. या पुरस्कार सोहळ्यासाठी संयोजक समितीची स्थापना करण्यात आली. यामध्ये संस्कार भारती, आरळी बुद्रुक महोत्सव समिती, तुळजापूर तालुका पत्रकार संघ, मराठवाडा साहित्य परिषद शाखा तुळजापूर यांचा सहभाग आहे. ममता सपकाळ यांना हा पुरस्कार पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थानचे सहअध्यक्ष गुरुवर्य गहिनीनाथ महाराज औसेकर आणि श्री तुळजाभवानी मंदीराचे महंत तुकोजी बाबा यांच्या हस्ते जिजाऊ जयंतीनिमित्त १२ जानेवारीला श्रीनाथ लॉन्स येथे प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार भारतीच्या प्रदेशाध्यक्ष स्नेहलताई पाठक असणार आहेत.



जेष्ठ समाजसेविका पद्मश्री अनाथांची माई सिधुताई सपकाळ यांच्या कार्याचा वारसा समर्थपणे पुढे चालवण्याचे शिवधनुष्य कन्या ममता सपकाळ यशस्वीतेनी पेलत आहेत. शेकडो अनाथांची ताई म्हणून हिमतीने सांभाळ करत आहेत. त्या कार्याला बळ मिळावे यासाठी पहिलाच राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार देण्यात येतो आहे.

# कृषी महाविद्यालय डोंगरशेळकी तांडा येथे रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी संलग्नित डोंगरशेळकी तांडा येथील कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम, एचडीएफसी बँक. लि. शाखा उदगीर व नागप्पा अंबरखाने रक्तपेढी, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेच्छा रक्तदान शिबिराचे, यशस्वी आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संग्राम पटवारी यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उद्घाटन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.पी. सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ.ए.एम. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ.ए.जी. दापकेकर, रासेयोचे कार्यक्रमाचे अधिकारी डॉ.एस.बी. पवार, उदगीर येथील नागप्पा अंबरखाने रक्तपेढीचे डॉ. शेटकार बी.एम, व्यवस्थापन प्रमुख एचडीएफसी बँक.लि.

शाखा उदगीरचे प्रमोद पवार, महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि रासयो स्वयंसेवक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि उपस्थितांचे ऋणनिर्देश, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.एस.बी. पवार यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधिका नाकील व अनुजा कचवे या विद्यार्थिनी केले.

# गिरकचाळ येथे दत्त जयंतीनिमित्त किर्तन व प्रवचन कार्यक्रम संपन्न





**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि.१५ डिसेंबर -**

निलंगा तालुक्यातील गिरकचाळ येथे नदीच्या काठावर वसलेले एका छोट्याश्या गावात सूमारे ५०० वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेची जोपासना आज तगायत गावकऱ्यांनी चालू ठेवली आहे. येथील प्राचीन दत्त मंदीर खूप प्रसिद्ध आहे. त्यामूळे दत्त जयंतीचे औचित्य साधून रविवारी दि.१५ डिसेंबर रोजी प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही प्रवचन व कीर्तनाचे आयोजन रघुनाथ महाराज व त्यांची ज्येष्ठ चिरंजीव नवनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते.

या प्रवचंकार शंकर महाराज गौरकर यांनी सदभक्तासमोर समोर दत्तात्र्ये हे त्रिमूर्तींचे (ब्रम्हा, विष्णू, महेश) अवतार आहेत. दत्तात्र्ये हे संन्यास व अद्वैत वेदान्ताचे प्रतिक आहेत. दत्तात्र्ये ऋषी अत्री आणि त्यांच्या पत्नी अणूसया यांचे पूत्र आहेत. पुराणानूसार अनुसया यांच्या पतिव्रतेच्या गूणांमूळे त्रिमूर्ती स्वतःहा मनुष्य रुपात त्यांच्या शरण आले. अनूसयाने त्यांना बालक रूप दिले आणि त्यातूनच भगवान दत्तात्रेय यांचा जन्म झाला असे म्हणाले. प्रवचन व किर्तनांतर महीलांनी दत्तात्रेयेचा पाळना घालण्यात आला.

गावातील व बाहेर गावाहून आलेल्या भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन राहूल कांबळे यांच्या वतीने करण्यात आले होते. दत्त जयंतीनिमित्त भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी भाविक भक्त व महीला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाऊसाहेब दूरदृष्टीचे समाजसेवक होते : डॉ. हेमंत देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

विद्येसाठी जगण्याचा मोह तयार करण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले. विद्ये शिवाय जीवनामध्ये काहीच नाही हे भाऊसाहेबांनी जाणले होते. भाऊसाहेब हे दूरदृष्टीचे समाजसेवक होते असे उद्गार प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांनी काढले. ते येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे जीवन व कार्य या विषयावर १२५ व्या जयंतीनिमित्त या.द.व. देशमुख कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, तिवसा जिल्हा अमरावती व शिवाजी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी बोलत होते.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर हे होते. तर प्रमुख उपस्थिती डॉ.प्रशांत हारमकर अर्थशास्त्र विभाग प्रमुख यादव महाविद्यालय तिवसा, प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे, समन्वयक डॉ. विष्णू पवार यांची होती. पुढे बोलताना प्राचार्य देशमुख म्हणाले, त्या काळामध्ये शिक्षणाची सोय नव्हती, स्पृश्य अस्पृश्य वाद होता ते मिटवण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले.

त्यांनी स्वतः अतिशय परिश्रमातून पीएचडी पदवी प्राप्त केली आणि समाज उद्धारासाठी, लोकोद्धारासाठी आपले जीवन कार्य अर्पण केले. त्यांनी केलेले कार्य नवीन पिढीपर्यंत तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम व्याख्यान मालातून केले जात आहे असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. मांजरे म्हणाले, भाऊसाहेब थोर समाज सुधारक होते. शिक्षणाची क्रांती त्यांनी केली. ग्रामीण भागातील जनतेचा विकास केला. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना मार्ग मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विष्णू पवार, प्रास्ताविक डॉ. प्रशांत हरमकर तर आभार प्रा. बालाजी सूर्यवंशी यांनी मानले.

यावेळी कार्यक्रमाला प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीदत्त जयंती विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**

**औसा दि.१५ डिसेंबर -**

औसा तालुक्यातील किल्लारी व सिरसल येथील दत्त मंदीरात सकाळी श्री सद्गुरु दत्त यांचा महाभिषेक करण्यात आला. यानंतर किर्त, दत्त जन्माचा पाळणा महिलांनी गाऊन गुलाल उधळण्यात आला. रांगा लावून भाविकांनी दर्शन घेतले. वृक्षारोपण, किर्तन व महाप्रसादाने उत्सवाची शनिवार दि.१४ रोजी सांगता करण्यात आली. किल्लारी येथील दत्त मंदिरात दत्त जन्मोत्सव आनंदात साजरा करण्यात आला.

शुक्रवारी सकाळी महीला भजनाचा कार्यक्रम झाला. तर शनिवारी सकाळी श्रीदत्त यांना महाभिषेक करण्यात आला. हभप. प्रशांत घोडके महाराज बलसुरकर यांचे कीर्तन झाले. त्यानंतर दुपारी दत्त जन्माचा गुलाल फुलांसह उधळण्यात आला. काल्याचे कीर्तन, पाळणे गीत, नवसाचा पाळणा, वृक्षारोपण व महाप्रसाद वाटप करण्यात आला. हभप. प्रशांत घोडके महाराज बलसुरकर, ईश्वर गुरुजी, विलासदेव कुलकर्णी, सरपंच सुलक्षणा बाबळसुरे, ग्रा.प. सदस्य वैशाली गुंजोटे, सुमनबाई भोसले, शुभांगी स्वामी, पूजा स्वामी, बंकट पाटील, बाळू बिराजदार, केशव बिराजदार, जोतिराम भोसले, ज्ञानेश्वर भोसले, तुकाराम मोहिते, राजेंद्र पोतदार, सूर्यकांत बाळापुरे, प्रभाकर बाबळसुरे, शिवदर्शन गुंजोटे, डॉ. निर्मला गुंजोटे, निर्मला टाचले, जनाबाई मोहिते, उज्वला बाबळसुरे, सुवर्णा टाचले, सोमनाथ बाळापुरे, युवराज टाचले, गोपाळ बाबळसुरे, डॉ. ऋषिकेश गुंजोटे, महेश गुंजोटे, विजय टाचले, कार्तिक टाचले, नितीन टाचले, आकाश टाचले, सुमित भोसले आदी नागरिक उपस्थित होते. महोत्सव यशास्वीपणे पार पाडण्यासाठी श्री दत्त मंदीर समितीचे अध्यक्ष अंकुश टाचले, गुलाब शिंदे, राजेन्द्र पोतदार, सूर्यकांत बाळापुरे, विश्वनाथ गुंजोटे यांनी पुढाकार घेतला होता. सिरसल येथे याही वर्षी दत्त जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. शनिवारी जन्मोत्सवानिमित्त सिरसल, येळवट, किल्लारी, पारधेवाडी, कारला, कुमठा, मोगरगा, तळणी व परिसरातील दत्तभक्तांनी दर्शन घेऊन उत्सव साजरा केला.

समितीचे अधक्ष हिरालाल आळंगे, चंद्रशेखर हांडे, दिनेश सूर्यवंशी, बालाजी हांडे, प्रकाश पाटील, बाळू सूर्यवंशी, अभिषेक रणदिवे यांनी महोत्सव साजरा करण्यासाठी परिश्रम घेतले होते.

# श्यामार्य कन्या विद्यालयात विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न




**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था संचलित श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमी प्रस्तुत श्यामलाल कला पंधरवाडा अंतर्गत विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम म्हणजेच सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य होते.

संस्थेच्या सहसचिव अंजुमनी आर्य, रमाकांत चटनाळे, श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमीचे संयोजक सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी चव्हाण, श्यामार्य कन्या विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक प्रवीण भोळे, श्यामलाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत खंदारे, श्यामलाल प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक उगिले, पर्यवेक्षक राहुल लिमये, श्यामार्य कन्या विद्यालयाचे प्रभारी पर्यवेक्षक विजय बैले, पारिजात शिशुविहारच्या संयोजिका अवंतिका मोरतळे आदी मान्यवर उपस्थित होते.

श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमी अंतर्गत कला पंधरावाडा, क्रीडा पंधरवडा व प्रश्नमंजुषा अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रत्येक उपक्रमासाठी मंच देण्याचे कार्य श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य व सर्व संस्था पदाधिकारी यांनी कार्य केले आहे. कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विकासाच्या विविध संधी उपलब्ध आहेत. फक्त त्याकडे आपण सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. अध्ययन, संस्कार व कलाविष्कार त्रिवेणीचा संगमातून शालेय जीवन फुलते.

त्याबरोबरच व्यक्तिमत्व विकासासाठी हे क्षेत्र अतिशय उपयुक्त आहे.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वाखाणण्याजोगा असून आपण स्नेहसंमेलन निमित्ताने प्राप्त झालेल्या व्यासपीठाचा विधायक उपयोग विद्यार्थ्यांनी घ्यावा असे उद्घाटन प्रसंगी रवी हासरगुंडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीहरी निडवंचे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वरी बिरादार सृष्टी गुळंगे वैष्णवी सूर्यवंशी त्यांना सहाय्य संगीता खादीवाले यांनी केले. आभार पर्यवेक्षक विजयकुमार बैले यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख वैशाली अनकल्ले, सहाय्यक आम्रपाली गायकवाड, संगीता सुतार, राहुल गुरमे, महेश हुलसुरे, सचिन तिवारी, सतनप्पा हुरदळे, संभाजी कोयले, माणिक कांबळे, विक्रम मलकापूरे, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, गोपाळ पुल्लागोर, समाधान कांबळे, दिलीप वाघमारे यांनी काम पाहिले.

# मुथुट फायनान्स शाखेची नळदुर्गमध्ये स्थापना

**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.१५ डिसेंबर -**

नळदुर्ग येथे दि.१३ डिसेंबर रोजी मुथुट फायनान्स लिमिटेड कंपनीच्या शाखेची सुरुवात करण्यात आली असुन या कंपनीमुळे नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीकांना सोने तारण कर्ज मिळणे आता सोईचे होणार आहे.

मुथुट फायनान्स लिमिटेड कंपनीची शाखा सुरु करण्यात आली आहे. यावेळी शाखा शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास येडगे हे होते तर शाखेचा शुभारंभ तुकाराम घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन मुथुट फायनान्स कंपनीचे आरएम राकेश कुमार व झोनल मॅनेजर श्रीधर रेड्डी हे उपस्थित होते.

Made with Xodo PDF Reader and Editor
TARUN BHART 14 DES.2024:Copy of Layout 1 15-Dec-24 7:48 PM Page 1



# आघाडीला क्लीन स्विप दिलेला जालना जिल्हा राहिला मंत्रीपदाविना!

## गटा-तटाच्या वांद्यात बबनराव लोणीकर, अर्जुन खोतकरांची उपेक्षा, रावसाहेब दानवेंचे पुत्रप्रेम आडवे!



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/केदार शर्मा**

आज दिनांक १५ डिसेंबर रविवारी सायंकाळी चार पर्यंत मंत्रिमंडळाच्या विस्तारात नेमका कोणाचा नंबर लागेल याचाच अंदाज नसताना शेवटी महाविकास आघाडीला क्लीन स्वीप देणाऱ्या जालना जिल्ह्याच्या हाती मात्र खाली कटोरा आलाय जालना जिल्ह्याला यावेळी मंत्र्यांना काम भागवावे लागणार आहे. मंत्री पदाचे प्रबळ दावेदार असलेले माजी मंत्री बबनराव लोणीकर यांचा भाजपा कोट्यातून तर शिवसेना कोट्यातून अर्जुनराव खोतकर यांच्या नावाची चर्चा होते व शेवटच्या क्षणापर्यंत दोघांनाही मंत्रीपदाच्या शपथ विधीसाठी फोन येईल अशी अपेक्षा असताना शेवटी दोन्ही नेत्यांची उपेक्षा झालेली आहे यामागील गुड समजलेले नसले तरीही भाजपातील रावसाहेब दानवे यांचे पुत्रप्रेम यात आडवे आले असे समजले जाते तर तब्बल सहा वेळेस निवडून आलेल्या व माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांना पहिल्यांदाच पटकणी दिलेल्या हिकमत दादा उडान यांना संधी द्यावे यासाठी शिवसेनेतील एक गट सक्रिय असल्याचे कळाल्याने शेवटी जालना जिल्ह्यातील मंत्री पदाच्या निवडी बाबतचा निर्णय लांबणीवर टाकला या बाबीमुळे मात्र जालना जिल्ह्याचे नुकसान झालेले आहे.







भाजप अंतर्गत धुसपूस आता झाकून राहिलेली नाही, लोणीकर प्रबळ दावेदार असताना, माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी आपले आमदार पुत्राला मंत्री करण्यासाठी मोठी लोबिंग केल्याचे समजते, यात कोणालाच संधी न दिल्याने जिल्ह्याचे नुकसान झालेले आहे. जालन्याचे मंत्रिपद थेट परभणीत मेघना ताईंना दिल्याने हाती धूपाटणे आले.

पक्षाचे निष्ठवंत सामान्य व जमिनीवरील नेता म्हणून ओळख असलेले माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या कार्यकाळात मराठवाडा वॉटर ग्रीड योजना अफलातून यशस्वी झाले याशिवाय परतूर मतदार संघात कधी नव्हे ते तब्बल चार ते पाच हजार कोटीच्या विकास कामामुळे लोणीकर चर्चेत आहेत याशिवाय दोन्ही कारणे तब्बल पाच वेळा निवडून आले तर यावेळी त्यांनी हॅट्रिक साधली होती हे सर्व पाहताना लोणीकर यांचे नाव निश्चितच असताना जिल्ह्यातील भाजपा अंतर्गत असलेले गटागटाचे राजकारण जिल्ह्याच्या अंगलट आल्याचे बोलले जाते जालना जिल्ह्यात कधी नव्हे ते महाविकास आघाडीला पाचही ठिकाणी महायुतीने पटकन दिलेली आहे. जिल्ह्यात महायुतीला क्लीन स्वीट विजय मिळालेला असतानाही, जिल्ह्याच्या पदरी शेवटी निराशाच हाती आल्याने जिल्ह्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांत् प्रचंड नाराजी आहे.

## केंद्रीय अर्थमंत्र्यांशी डॉक्टर स्वप्नील मंत्री यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**परतुर: प्रतिनिधी**

भारतीय अर्थव्यवस्थेतील परिवर्तन, आरोग्य सेवा सुधारणा, व्यावसायिकांच्या सोयीसाठी जीएसटीचे सुलभीकरण, विविध योजनांमध्ये नवीन आर्थिक सर्वेक्षणावर आधारित नावनोंदणी या संदर्भात चर्चा करण्यासाठी भाजपा वैद्यकीय आघाडीचे प्रमुख डॉक्टर स्वप्नील मंत्री यांनी भेट घेतले व विविध विषयावर निवेदन सादर केले.

निवेदन देताना, देशाने २०२५ पर्यंत सार्वजनिक आरोग्यावर आपल्या ऋळ्झ च्या किमान २.५% खर्च केला पाहिजे यावर भर दिला.

२०१९ पासून सीतारामनजी यांचा अथक दृष्टिकोन आणि अर्थव्यवस्थेवर सतत लक्ष ठेवण्याचे फळ मिळाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली त्या भारतीय अर्थव्यवस्थेला नाजूक पाच वरून जगातील पाचव्या क्रमांकावर बदलू शकल्यात. त्या प्रामाणिक, मेहनती, सुसंस्कृत आणि मानवतावादी नेत्या आहेत. अमूल्य वेळ दिल्याबद्दल त्यांचे आभार शेवटी डॉक्टर मंत्री यांनी मानले.

## संक्षिप्त



### परतूर शहरात श्री दत्त जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परतुर: प्रतिनिधी**

परतूर शहरात विविध ठिकाणी काल दिनांक १४ डिसेंबर शनिवारी भगवान दत्त दिगंबर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी मुंढा भागातील दत्त मंदिर भक्तांच्या वतीने सायंकाळी चार वाजता भव्य पालखी यात्रा काढण्यात आली श्री बालाजी मंदिर ते श्री दत्त मंदिर पर्यंत पालखी यात्रा काढण्यात आली या पालखी यात्रेत मोठ्या संख्येने विश्व महिला भाविक सहभागी झाल्या होत्या दत्त भजनांच्या व टाळ मृदंगाच्या निनादा पालखी काढण्यात आली सायंकाळी सहा वाजता करण्यात आला साजरा करण्यात आला तत्पूर्वी दत्त मूर्तीचे अभिषेक करून पूजा करण्यात आली यावेळी मंदिराचे पुजारी नटवर खंडेलवाल, शुभम खंडेलवाल, योगेश खंडेलवाल, केदार खंडेलवाल, गोविंद खंडेलवाल, यांच्यासह लखन जोशी, श्याम जवळेकर, गुणवंत मोर, यांच्यासह या भागातील व्यापारी व भाविक भक्तांनी विशेषता महिलांनी मोठी उपस्थिती दर्शवली होती याप्रमाणेच तहसील भागातील दत्त मंदिर गाव भागातील राम मंदिर व दत्त मंदिर येथेही मोठ्या उत्साहाने दत्त जयंती उत्सव साजरा करण्यात आला.



ए एच पि . संस्थापक अध्यक्ष प्रविणभाई तोगडीया यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर आयोजित आज आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल संस्थापक अध्यक्ष मा.श्री. हिंदुरुदय सम्राट डॉ. प्रवीण भाई तोगडिया यांच्या जन्मदिवसानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले ह्यावेळेस ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले असून त्या रक्तदात्यांचे अविनाश देशमाने यांनी मनापासून धन्यवाद दिले.

## अवैध वाळुची वाहतुक करणारे टिप्पर पोलिसांनी केले जप्त

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध पोलीस स्टेशनच्या समोरून अवैध वाळूचे टिप्पर बिंदासपणे सुरू होते. परंतु काही महिन्यापूर्वी. पारध पोलीस स्टेशनला पोलीस निरीक्षक संतोष माने यांनी व त्यांचे अन्य सहकारी यांनी या ह्या अवैध वाळूच्या टिप्पर चालकांवर कारवाई सुरू केली दिनांक १३/१२/२०२४ रोजी भोकरदन येथून पिंपळगाव रेणुकाई ते पारध जाणारे रोडवर अवघडराव सावंगी फाट्यावर एक निळसर पांढरे रंगाचे टाटा कंपनीचा एम एच २१ बी व्ही ५५८८ टिप्पर यामध्ये शासनाची रॉयल्टी न भरता ५ ब्रास रेती ची अवैध्य रित्या वाळूची चोरटी वाहतूक करीत असताना. टिप्परसह २० लाख २० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करून टिप्पर चालक आरोपी रामेश्वर आसाराम राऊत वय २७ राहणार फत्तेपुर तालुका




भोकरदन यांच्या विरुद्ध गु.र.न २४२/२०२४ कलम३०३ (२) भारतीय न्याय सहायता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक केले वरील कारवाई ही पोलीस निरीक्षक संतोष माने,पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रकाश शिनकर , पोलीस कॉन्स्टेबल सुनील जाधव व त्यांच्या अन्न सहकाऱ्यांनी ही कारवाई केल्याने अवैद्य रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्याचे धागे दणाणले आहे.

## भारतीय संविधानानुसार देशातील जनता हीच सर्वोच्च -न्यायमुर्ती संदीपकुमार मोरे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतात लोकशाहीचे राज्य अस्तित्वात आहे. लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजेच लोकशाही होय. प्रत्येक व्यक्तीला मुलभूत हक्क प्रदान करण्यात आले असून हे हक्क अबाधित ठेवण्याचे कार्य मा.सर्वोच्च न्यायालयाकडून केले जाते. भारतीय संविधानानूसार देशातील जनता हीच सर्वोच्च मानली जाते. असे प्रतिपादन जालना जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती संदीपकुमार मोरे यांनी केले.

जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा रविवार, दि. १५ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी येथे पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, अतिरिक्त पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे, जिल्हा सरकारी अभियोक्ता ङ बाबासाहेब इंगळे, ङ विकास पिसुरे, ङ दीपक शिवतारे यांची प्रमुख उपस्थिती होती. उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती संदीपकुमार मोरे म्हणाले की, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशान्वये जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. समाजातील आर्थिक दुर्बल घटकासह शेवटच्या लाभार्थ्यांस न्याय मिळवून देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण काम करत असते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत विविध सेवा विधी सहाय्यासाठी गरजूना उपलब्ध करून देण्यात येते. तसेच राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा गरजूंना लाभ मिळावा यासाठी निकष लावले जातात. तरी खऱ्या लाभार्थ्यांना विविध योजनाचा लाभ मिळवून देणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. आज विविध विभागाचे स्टॉल कार्यक्रमाच्या ठिकाणी उभारण्यात आले असून विविध योजना जाणून घेवून कोणत्या योजनेच्या निकषात आपण पात्र आहोत याची परिपूर्ण माहिती जाणून घेत त्या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## रेलगाव- पिंपळगाव रेणुकाई रस्त्याचा कामाला गती, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतुन रस्ता होणार चकाचक

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई ते रेलगाव रस्ता हा गेल्या अनेक वर्षापासून धूळखात पडून होता.सदर रस्त्यावर आमदार संतोष दानवे यांनी २ कोटी १६ लक्ष अशाप्रकारे मोठा निधी खेचुन आणत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतुन या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात देखील केली होती.मागील काही महिन्यापासुन सदर रस्त्याचे काम रखडले होते.त्यामुळे या भागातील वाहनधारकांना रस्त्यावर प्रवास करताना मोठा यातना सहन करावा लागत असे. मागील काही दिवसापासून रस्त्यावर युद्धपातळीवर खडी अंथरण्याचे काम सुरू आहे.मात्र असे असले तरी कामात गुणवत्ता राखण्याची अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.



भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई ते रेलगाव या रस्त्याचे काम २००९ मध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतुन पूर्ण करण्यात आले होते.मात्र काही वर्षानंतर रस्त्याची मोठी दुरावस्था झाली होती.त्यामुळे या भागातील शेतकरी तसेच वाहनधारकांना या रस्त्यावरुन जिव मुठीत धरुन प्रवास करावा लागत असे.विशेष म्हणजे या चार किलोमीटर रस्त्याचे अंतर कापण्यासाठी बराच अवधी लागत असल्याने वाहनधारकांतुन तिव्र संताप व्यक्त केल्या जात होता.सदर रस्ता अतिशय खराब झाल्याने रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढुन खड्यामुळे या रस्त्यावरील नागरिकांना कंबरेचे व मनक्याचे आजार देखील बळावले होते. अनेक वेळा या रस्त्यावर अपघाताच्या घटना देखील घडल्या.मात्र तरी देखील संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात असे. दरम्यान पिंपळगाव रेणुकाई परिसरातील कोळेगाव,माळेगाव,मोहळाई,कोसगाव आदी भागातील शेतकरी हा मोठ्या प्रमाणात मिरचीचे उत्पादन घेतो.मिरची विक्रीसाठी या शेतकऱ्यांना पिंपळगाव रेणुकाई येथील मिरची बाजारपेठत मिरची विक्रीसाठी आणावे लागते.मात्र रस्ता खराब असल्याने शेतकऱ्यांना देखील अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याचे चित्र दरवर्षी या रस्त्यावर दिसत होते.परिसरातील नागरिक व पुढाऱ्यांनी या रस्त्याचे काम लवकर पूर्ण व्हावे म्हणून अशी मागणी आमदार संतोष दानवे यांच्याकडे केली होती.सदर रस्ता दळणवळण व शेती विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने आमदार दानवे यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतुन २ कोटी १६ लक्ष रुपयाचा निधी मंजुर घेत रस्त्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात केली.प्रदिर्घ प्रतिक्षेनंतर कामाला सुरूवात करण्यात आली असल्याने या भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले होते.मात्र सदर रस्त्याचे काम मागील सहा महिन्यापासुन रखडले होते.त्यामुळे रस्त्यावर प्रवास करताना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होता.पावसाळ्यात तर थोडा जरी पाऊस पडला तर या रस्त्यावर प्रवास करणे जिकरीचे बनत होते.त्यामुळे याकडे लक्ष देऊन तत्काळ रखडलेल्या रस्त्याचे काम मार्गी लावण्याची मागणी पावसाळ्यापासुन जोर धरत होती.त्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या कामाला गती देण्यात आली आहे.आता रस्त्याच्या गुणवत्तेकडे लक्ष लागून आहे.

# केंद्रात व राज्यात आपले सरकार असून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील जनतेने विश्वास टाकावा -आमदार अर्जुन खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

निधी आणणं हे काम काही सोपं नाही. मंत्रिमंडळाचा अजून विस्तार होणे बाकी असतांनाही आपल्या प्रयत्नांना यश आले आणि ६७ कोटी रुपयांचा निधी आपल्याला मिळाला आहे. तूर्तास आपण आज चार रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ केला असला तरी हा कामांचा सिलसिला असाच सुरु राहील, असे मत आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलतांना व्यक्त केले. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये जालना मतदार संघातील जनतेने आपल्यावर जो विश्वास टाकला व मला प्रचंड मताधिक्याने विजय केले त्याबद्दल मी जालना मतदारसंघातील तमाम मतदार बंधू भगिनीचे जाहीर आभार व्यक्त करतो व त्यांना मनापासून धन्यवाद देतो ,त्यांनी जो माझ्यावर विश्वास टाकला त्या विश्वासाला पात्र राहिल असे मी कार्य केल्याशिवाय थांबनार नाही, विधानसभा निवडणुकीमध्ये जे आपण मतदारांना



आश्वासन दिले आहे त्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी मी कटिबद्ध राहील असे वचन देतो असे मार्गदर्शन करताना आ. खोतकर यांनी सांगितले. आता केंद्रात व राज्यात आपले सरकार असून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील जनतेने आमच्यावर विश्वास टाकावा जेणेकरून विकास काम करण्यासाठी अडचणी येणार नाहीत.गोरंट्याल यांचा नामोल्लेख न करता यावेळी त्यांनी त्यांच्यावरही टिका केली.

भांडवली गुंतवणूकीसाठी राज्याच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत जालना शहरात ६७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याच अनुषंगाने आज आयटीआय पाण्याची टाकी ते मारोती मंदिर चौक (३.४९ कोटी), रेल्वे गेट ते माँ किराणा (२.५० कोटी), पेशवे चौक ते लक्कडकोट पुलापर्यंत (१.१० कोटी), श्रीजी ढाबा ते शंकुतलानगर (२.०६ कोटी) या कामाचा आज शनिवारी आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी मार्गदर्शन करतांना आ. श्री. खोतकर बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, काही लोकांनी निधीची वाट न पाहताच भूमिपूजन उरकुन घेतले असले तरी आपण तसे करणार नाही. अगोदर निधी मंजूर करुन आणला आणला आणि नंतर भुमिपूजन केले आहे. आज सकाळी प्रथम प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले आणि कामाला सुरुवात केली. आपण आपल्या कामाचा हा सिलसिला असाच सुरु ठेवणार आहोत, मंत्री मंडळ विस्ताराबाबत बोलतांना



आ. खोतकर म्हणाले की, मला याबाबत काहीच माहित नाही परंतू आमचे नेते एकनाथराव शिंदे हे जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य राहिल, असेही आ. खोतकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी युवा सेनेचे सचिव श्री.अनिरुध्द खोतकर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, संपर्क प्रमुख पंडीतराव भुतेकर तसेच गणेश सुपारकर, आत्मानंद भक्त आदींसह भाऊसाहेब कदम, बाबासाहेब इंगळे, फिरोजलाला तांबोळी, गणेश मोहिते, दिनेश भगत, पांडुरंग डोंगरे, राहुल हिवराळे, प्रदीप गायकवाड, अमोल ठाकुर, बाबुमामा जाधव, विजय जाधव, दशरथ तोंडूळे, योगेश रत्नपारखे, माधु गायकवाड, प्रमोद पवार, संतोष परळकर, संदीप साबळे, किशोर शिंदे, जाफर खान, राजू गायकवाड, स्वप्नील घुले, संजय पा. डुकरे, जगदीश रत्नपारखे, दिपक वैद्य, संतोष रासवे, किशोर शिंदे, प्रभाकर पवार, प्रमोद पवार, गणेश चव्हाण, सुशिल भावसार, संतोष परळकर, ताहेर खान, बबनराव मगरे, सुहास मुंडे, माधु गायकवाड, किशोर शिंदे, कुणाल जाधव, फिरदोस भाई, जाफर खान, पांडुरंग शिंदे, मनोज देवरे, किशोर शिंदे, राजू रमेश मुळे, अभिजीत गायकवाड, महेश कुलकर्णी, गोपाल काबलिये, मनपाचे बांधकाम अभियंता शेख सऊद आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### विष्णु पाचफुलेंना महापौर करणार -आ.खोतकर



आता विकास कामांचा धडाका सुरू केला जालनेकरांनी महानगर पालिका शिवसेना व महायुतीच्या ताब्यात देऊन विकासाकामे कायम सुरू ठेवावी. जालना शहराचा चेहरा-मोहरा बदलणार असुन शिवसेनेचे शहप्रमुख विष्णु फुले यांच्या रूपाने महानगर पलिकेचा पहिला महापौर करण्याचा शब्द देखील यावेळी आ.अर्जुन खोतकर यांनी दिला.

Made with Xodo PDF Reader and Editor



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## परभणी येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर नांदेडात चोख पोलीस बंदोबस्त

# किरकोळ घटना वगळता नांदेडात शांतता

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ डिसेंबर**

परभणी येथील पोलीस कोठडीत असलेल्या एका आंदोलनकर्त्याचा मृत्यू झाल्यानंतर नांदेडमध्ये खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी चौख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. शहरातील सोमेश कॉलनी भागात किरकोळ दगडफेकीची घटना वगळता नांदेडमध्ये शांतता होती.

दिनांक ११ डिसेंबर रोजी परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. यावेळी परभणी पोलिसांनी असंख्य आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. यापैकी एक असलेल्या सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी या आंदोलनकर्त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला. दरम्यान मयत सोमनाथ सूर्यवंशी याचा मृतदेह शव विच्छेदनासाठी नांदेड येथे आणण्यात येत असल्याची अफवा पसरल्यावर नांदेडमध्ये पोलिसांनी नांदेड मध्ये चौख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. सोमेश कॉलनी येथे एका चार चाकी वाहनावर व एका दुकानावर दगडफेकीची घटना घडली. ही घटना वाऱ्यासारखी पसरताच शहरातील वजीराबाद, श्रीनगर, शिवाजीनगर यासह काही भागातील व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठानबंद केली. परंतु तास भरातच ही दुकाने पूर्ववत सुरू करण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांनी देखील शहरात फेरफटका मारून परिस्थितीची पाहणी केली. सोमेश कॉलनी येथील दगडफेकीची घटना वगळता शहरात सर्वत्र शांतता होती.







**आज नांदेड बंद**

दरम्यान या मृत्यूच्या निषेधार्थ नांदेड येथील आंबेडकरी चळवळीच्या वतीने उद्या दिनांक १६ डिसेंबर रोजी नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

# थंडीत कुडकूडताहेत चिमुकले विद्यार्थी

## बालवाडी ते प्राथमिक शाळा ९ ऐवजी १० वाजता भरविण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ डिसेंबर**

जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून तापमानाचा पारा खाली येत असून सकाळी शाळेत जाताना लहान मुलांचे हाल होत आहेत, यासंदर्भात शिक्षण विभागाने चिमुकल्या विफ्यार्थ्यांचे आरोग्य लक्षात घेता सर्व शाळा एक तास उशिराने म्हणजे सकाळी ९ ऐवजी १० वाजता भरवाव्यात अशी मागणी पालकातून होत आहे.

नांदेड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सकाळी आणि रात्री तापमानाचा पारा खाली येत आहे. त्यातच हवामान विभागाने जिल्ह्यात थंडीची लाट पसरण्याचा इशारा दिला आहे. त्याचबरोबर वातावरणात धुके असल्याने स्कूल व्हॅन आणि बस चालकांना वाहन चालवणे कठीण होत आहे. अशातच मुलांना झोपेतून उठवण्यापासून त्यांना व्हॅनपर्यंत नेण्यासाठी पालकांनादेखील धावपळ करावी लागते. मागील काही दिवसांपासून नांदेडमध्ये थंडी वाढली आहे. अशात मुलांना सकाळी ९ वाजता शाळेत जाण्यासाठी किमान एक ते दीड तास आधी उठावे लागत आहे. थंडी जास्त असल्याने मुलंदेखील अंथरुणातून उठण्यास कंटाळा करीत आहेत. तसेच गारव्यामुळे मुलांना सर्दी, खोकला यांसारखा त्रास देखील जाणवत आहे. त्यामुळे नियमीत शाळेत जाणाऱ्या विद्यार्थांना आरोग्याच्या समस्येमुळे नाईलाजास्तव शाळेला दांडी मारावी लागत आहे. दप्तरासोबत स्वेटर, हॅन्ड ग्लोज, कानटोपी या सर्व गोष्टी शाळेत घेऊन जावं लागत आहे. त्यामुळे आता एक तास उशिराने म्हणजे ९ ऐवजी सकाळी १० वाजता बालवाडी ते प्राथमिक शाळा भरवण्यात यावी अशी मागणी होत आहे.



## संक्षिप्त वृत्त




### परभणीतील आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा : गुरु रविदास समता परिषद

**नायगाव**-परभणी रेल्वे स्टेशन समोर असलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळील भारतीय संविधान प्रतिकृती पुस्तके ची तोडफोड करणाऱ्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. दलित महिला बालक वृद्ध तसेच विद्यार्थी व तरुणांवरील खोटे गुन्हे मागे घेण्यात येऊन कोंबिंग ऑपरेशन त्वरित थांबविण्यात यावे आणि मुख्य सूत्रधारांचा शोध घेवून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी यासह इतर मागण्यांसाठी नायगांवच्या तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांच्यामार्फत मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना अ. भा. गुरु रविदास समता परिषद तालुका शाखा नायगांवच्या वतीने आज १४ डीसेंबर रोजी निवेदन देण्यात आले. यावेळी अ. भा. गुरु रविदास समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष गंगाधरराव गंगासागरे, महासचिव प्रकाशभाऊ कामळजकर, तालुकाध्यक्ष माधव गंगासागरे, हणमंत गंगासागरे, संतोष कांबळे, सटवा बरबडे यासह अनेक कार्यकर्त्यांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान सदरील घटनेच्या निषेधार्थ आज १४ डिसेंबर रोजी नरसी (ता. नायगांव) येथे तमाम संविधान प्रेमी नागरिकांच्या वतीने जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला तसेच स. पो. नि. श्रीधर जगताप यांना निवेदन दिले. यावेळी लालबा सूर्यवंशी, देविदास सूर्यवंशी, साईनाथ जिगळेकर आदींची उपस्थिती होती.

# स्वत:ला असा खेळाडू बनवा की तुम्ही कधीही मागे पडणार नाहीर : शहाजी उमाप

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १५ डिसेंबर**

स्वतःला असा खेळाडू बनवा की तुम्ही कधीही मागे पडणार नाही'' असे मत नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी व्यक्त केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा येथे दि. १४ डिसेंबर रोजी पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल (पुरुष) स्पर्धे चे उद्घाटन समयी खेळाडूंना मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, नांदेड गुरुद्वारा लंगरचे बाबा कुलदीपसिंघ, आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल मार्गदर्शक अजित पाटील, पॅरा ऑलिम्पिक थेलेटिक्स खेळाडू भाग्यश्री जाधव, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू व आंतरराष्ट्रीय पंच अंजली पाटील, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त व स्पर्धा समन्वयक अंकुश पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. डी. एन. मोरे, नारायण चौधरी, डॉ. सिंकूकुमार सिंह, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी मोहम्मद शकील, आंतर विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, क्रीडा विभागाचे प्र. संचालक डॉ. भास्कर माने, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांची उपस्थितीती होती. यावेळी बोलतांना विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप म्हणाले की खेळाडूंनी फक्त प्रमाणपत्र मिळवण्यासाठी न खेळता खेळातील अत्याधुनिक तंत्राचा आणि युक्तीचा वापर करून जिंकण्यासाठी मनाशी जिद्द धरून खेळावे. प्रत्येक चूक आपल्याला काहीतरी शिकवून जाते, त्या चुकीपासून धडा घेऊन पुढे चुका दुरुस्त करून खेळामध्ये अधिक कुशलता आणण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असावे.कार्यक्रमाचा अध्यक्षीय सामारोप विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केला.

या सर्व स्पर्धा सुरळीत चालण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली पुढील समित्यांचे गठन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आयोजन स्वागत व शिष्टाचार समिती, तक्रार निवारण समिती, मैदान समिती, तांत्रिक समिती, प्रशिक्षक व खेळाडू निवास समिती, वाहतूक समिती, पात्रता समिती, उद्घाटन व उध्दघोषक समिती, स्वच्छता व सुशोभीकरण समिती, पाणी व्यवस्थापन समिती, भोजन व चहापाणी समिती, वित्त व लेखा समिती, प्रसिद्धी समिती, पंचव्यवस्था समिती, कार्यालय कामकाज समिती, सुरक्षा समिती, वैद्यकीय समिती इत्यादी समित्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांनी तर आभार प्रदर्शन राजेश कारंजकर यांनी केले.

# यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे रुग्णाची कॅन्सरवर यशस्वी मात!




**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ डिसेंबर**

येथील रुग्ण दिगंबर लाठकर यांना ऑगस्ट २०२३ दरम्यान मुख जिभेवर कर्करोगाचे निदान नांदेड येथील कान,नाक,घसा तज्ञ डॉ.सुभाष कोमावार यांच्याकडे झाले त्यानंतर डॉ. कोमावार यांनी सदरील रुग्णास पुढील उपचारांसाठी सिंकदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल येथे मेडिकल ऑन्कॉलॉजिस्ट डॉ. भरत वासवानी यांच्याकडे संदर्भित केल्यानंतर मुख कर्करोगाची पुष्टी झाल्यानंतर यशोदा हॉस्पिटल सिकंदराबादचे सर्जिकल ऑन्कॉलॉजिस्ट डॉ.सोमा श्रीकांत यांनी अतिशय उत्कृष्टरीत्या शस्त्रक्रिया करत रुग्णाचा कर्करोग ग्रस्त भाग काढून टाकला तसेच त्या भागावर चे रेडिएशन पण पूर्ण झाले एकंदरीत सर्व सुविधा एकाच हॉस्पिटलमध्ये मिळाल्यामुळे दिगंबर लाठकर यांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

आज या संपूर्ण गोष्टीला एक वर्ष पूर्ण झाले असून रुग्ण दिगंबर लाटकर हे अतिशय आरोग्यदायीरीया आयुष्य जगत आहेत त्यांनी डॉक्टरांनी केलेल्या शस्त्रक्रियेबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करत यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे कार्यरत असलेले असिस्टंट मॅनेजर किरण बंडे यांनी दिगंबर लाठकर यांना केलेल्या विशेष सहकार्याबद्दल त्यांचे श्री लाठकर यांनी आभार मानले. त्यांच्या या डॉक्टर कृतज्ञते बद्दल सर्व समाज बांधवाकडून कौतुक करण्यात येत आहे. सदर रुग्ण दिगंबर लाठकर यांचे हेल्थ इन्शुरन्स असल्यामुळे त्यांना कुठल्याही प्रकारची आर्थिक अडचण आली नाही व सर्जिकल ऑन्कॉलॉजिस्ट. डॉ. सोमा श्रीकांत यांची नांदेड येथे दर महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी व्हिजीट असते. तसेच मेडिकल ऑन्कॉलॉजिस्ट डॉ. भरत वासवानी यांची व्हिजीट ही दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी असते.

# श्रीदत्त जयंती यात्रेतील भाविकाचा मोबाईल अनोळखी चोरट्याने दिवसाढवळ्या चोरला

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ डिसेंबर**

माहूरगडावरील दतशिखर संस्थान येथील श्री दत्त जयंती यात्रेनिमित्त पूजारी चिंतामण भारती महाराज यांच्या मठात थांबलेल्या महागाव तालुक्यातील टेंभी येथील विवेक तालमवाड या भाविकाचा चार्जिंगला लावून कुलरवर ठेवलेला १० हजार ५०० रुपये किंमतीचा मोबाईल हँडसेट अनोळखी चोरट्याने दिवसाढवळ्या अनेकांच्या उपस्थितीत मोठ्या चलाखीने चोरला, चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, बील व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सदरील अनोळखी चोरट्याविरुद्ध वृत्त लिहीपर्यंत माहूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. आज रविवार दि. १५ डिसेंबर रोजी सकाळी ८ वा.च्या सुमारास दत्त शिखर या ठिकाणी संस्थानचे महापुरुष पूजारी चिंतामण भारती यांच्या मठातील हॉलमध्ये थांबलेल्या विवेक कैलास तालमवाड यांनी आपला टेक्नो स्पार्क ९ कंपनीचा १० हजार ५०० रुपये किंमतीचा मोबाईल चार्जरला लावून मोबाईल तेथेच ठेवून ते काही वेळेसाठी तेथून बाहेर पडले. दरम्यान, थोड्यावेळाने विवेक तालमवाड हे चार्जिंगला लावलेला आपला मोबाईल घेण्यासाठी त्या हॉलमधील स्वीचबोर्डाजवळ परत आल्यावर त्यांना ठेवलेला आपला मोबाईल त्या ठिकाणावरून गायब झाल्याचे दिसून आले. मोबाईल चोरीची घटना वेळेसह सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेली आहे मात्र, सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फूटेजमध्ये मोबाईल चोरुन नेतांना चोरटा दिसून येत असला तरी त्याची ओळख मात्र पटलेली नाही. मोबाईल खरेदी बील व सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेजच्या आधारे मोबाईल धारक(मालक) विवेक तालमवाड यांनी अज्ञात चोरट्याविरूद्ध मोबाईल फोन चोरीची तक्रार माहूर पोलिस स्टेशनला देण्यासाठी धाव घेतली होती.त्यामुळे वृत्त लिहीपर्यंत पोलिस प्रक्रियेची अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

# शिवसेना तालुकाप्रमुख पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १५ डिसेंबर**

हदगाव शिवसेना (शिंदे गट) तालुका प्रमुख पदासाठी अनेकजण रिंगणात असून आ. बाबुराव कदम कोहळीकर, माजी खा. सुभाष वानखडे व जिल्हा प्रमुख विवेक देशमुख यांच्यासह जुने, निष्ठावान, कडवट शिवसेनेचे पदाधिकारी हे कोणाच्या नावावर शिक्कमोर्तब करतील याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली असून या शर्यतीत असणारे संभाराव लांडगे, बालासाहेब कदम, आबा वानखेडे, केशव हरण पाटील, सुभाष धरमुरे, सुदर्शन मनुलेकर, बाबूसराव कदम, बाबुराव काळे मरडगेकर, अरविंद जाधव वाटेगावकर यांच्यासह इतरही निष्ठावान शिवसैनिकांपैकी एकाची निवडी झाल्यानंतर आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणूक, पंचायत समिती निवडणूक, स्थानिक स्वराज्य संस्थेचे निवडणुकीत पक्षास घवघवीत यश प्राप्त करून देण्याचे काम करावे लागणार आहे. तर एक प्रवाह असा आहे की, यावेळेस नवयुवकांनी आ. कोहळीकर यांना चांगलेच मताधिक्य देण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. त्यामुळे तालुकाप्रमुख पदासाठी निष्ठावंत शिवसैनिक युवा पिढीचा सुद्धा विचार होऊ शकतो. मागे पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत आ. कोहळीकर यांना हदगाव शहरासह तालुक्यात चांगलीच आघाडी घेतली होती तालुका प्रमुख पद हे मागच्या वेळेस निवघा सर्कलला मिळाला होता यंदा आमदार पदाचे मान या भागास मिळाल्या असल्याकारणाने तालुकाप्रमुख पदे निश्चितच पणे हदगाव शहरासह दुसऱ्या सर्कलला भेटण्याची दाट शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तवली जात असून या पदासाठी इच्छुक असलेल्या मध्ये खा. वानखेडे यांचे पुतणे आबा वानखेडे यांच्या नावाची जोरदार चर्चा होताना दिसत आहे. प्रत्येक निवडणुकीची व्यहुरचना आखण्याची कला, युवा वर्गात दांडगा संपर्क या सर्व बाबींचा विचार केल्यास त्यांच्या नावाचा सुद्धा विचार होऊ शकतो तर मनाठा व तामसा सर्कल मधून सुद्धा ऐनवेळी निष्ठावंत शिवसैनिकांच्या नावाची घोषणा होऊ शकते अशी चर्चा या तालुकाप्रमुख पदासाठीच्या निवडीच्या निमित्ताने होत आहे.

# जिद्द व परिश्रमाच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते : सपोनि बि.आर. कांबळे



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १५ डिसेंबर**

वर्तमान परिस्थितीमध्ये पुरेशा प्रमाणात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाकरिता भौतिक सुविधा उपलब्ध आहेत आपल्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार न करता अधिकारी होण्याचे ध्येय निश्चित करून जिद्द व परिश्रमाच्या बळावर विद्यार्थ्यांना यशाचे शिखर गाठता येते अशी प्रतिपादन सहायक पोलीस निरीक्षक बी आर कांबळे यांनी कुमारी पुजा फुगले यांची महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या सहाय्यक शाखाधिकारी पदी निवड झाल्यामुळे आयोजित सत्कार प्रसंगी भीमनगर येथे बोलताना केले.

केंद्रीय पोलीस दलामध्ये कार्यरत असलेले देविदास फुगले यांची सुकन्या कु. पुजा फुगले यांची नुकतीच स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या सहाय्यक शाखाधिकारी वर्ग एक पदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. कु. पूजा फुगले यांनी अनेक प्रतिकूल परिस्थितीवर मात करत या यशाचे शिखर गाठून आपल्या आई-वडिलांचे अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले कु.पूजा फुगले यांचे प्राथमिक शिक्षण मुदखेड येथील केंद्रीय विद्यालयांमध्ये तर माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालयात झाल्यानंतर त्यांनी बीएससी कृषी बायो टेक्नॉलॉजी मध्ये पदवी व एम एस सी बायो टेक्नॉलोजी मध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून स्पर्धा परीक्षेची तयारी केली आणि आई-वडिलांच्या व गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली आपले अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले.

पूजा फुगले यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांची आई पंचफुलाबाई देविदास फुगले, मामा जळबा चौदंते, ग्यानोबा चौदंते, गोविंद चौदंते, सेवानिवृत्त शिक्षक गणपतराव चौदंते, शंकर लोकडे, मिलिंद चौदंते, मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये त्यांच्या निवासस्थानी भिमनगर येथे सत्कार करून त्यांचे कौतुक करण्यात आले.

# परभणीतील घटनेमुळे उमरी बंद; उमरी वासीयांकडून मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १५ डिसेंबर**

भारतीय संविधानाच्या प्रतिधात्मक प्रतिचा अवमान करणाऱ्या समाजकंटक अरोपीस देशद्रोही कठोरातील कठोर शिक्षा करून त्या मागील मास्टर माईन्डचा शोध घेवून त्यांच्यावर ही समाजात तेड निर्माण करणारे दंगलग्रस्त गुन्हे दाखल करून पुन्हा अशा घटना घडू नये म्हणून आंबेडकर चळवळीसह इतर सामाजिक राजकीय , संघटना यांनी १३ डिसेंबर रोजी उमरी शहर कडकीडत बंदचे आवाहन केले होते. त्यांना उमरी शहर/तालुका रहिवाशी नागरीक यांनी संविधानाचा सन्मान म्हणून मोठ्या प्रमाणात सहभागी होवून प्रतिसाद दिला आहे.







मराठवाडयातील परभणी येथे भारतीय संविधान घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर एका समाज कंटकाने दि. १० डिसेंबर २०२४ रोजी भारतीय संविधान प्रतिधात्मक पुस्तीकाची अवमान करून समाजात तेड निर्माण करून जातीय दंगल घडवण्याचा प्रयत्न केला असल्यान महाराष्ट्रसह देशात संविधान प्रेमी व आंबडेकर चळवळीचे अनुयायी व इतर सामाजिक संघटना मोर्चा काढून शहर कडकडीत बंद ठेवून परभणीतील घटनेचा निषेध व्यक्त करीत रस्त्यावर उतरून अशा देशद्रोहीना फाशी शिक्षा व्हावी म्हणून निषेध मोर्चा करून निवेदन देत आहेत. उमरी शहरात ही सर्व जाती धर्माचे लोक संविधानाचा आदर करीत दि १३ डिसेंबर रोजी उमरी शहर कडकडीत बंद ठेवून भारतीय संविधान सार्वभौमत्व या शब्दाला जागून समता, स्वातंत्र्य, बंधुत्वा जागले आहे. या उमरी बंदच्या घटनेस नवनिर्वाचीत खासदार रविंद्र पाटील चव्हाण, आमदार राजेश पवार संदेश पाठवून पाठिबां दर्शविला आहे. तसेच गोरठेकर घराण्याचे राष्ट्रवादी जिल्हाउपाध्यक्ष पांडूरंग देशमुख गोरठेकर, जिल्हा छावा प्रदेश सदस्य राजेश मोरे, मुस्लीम संघटनेचे प्रमुख जावेदखॉन आदी सामाजिक संघटेने पांढीबा दर्शविला आहे.

यावेळी उमरी तालुका आंबेडकर चळळीचे नेते संजीव विठ्ठलराव सवई यांच्या नेतृत्वाखाली हा निषेध मोर्चा काढण्यात येवून तहसीलदार उमरी यांना निवेदन देण्यात येवून निषेध मोर्चाचा शांततेत समारोप करण्यात आला आहे. नेते गंगाधरराव सवई, अनिल सोनकांबळे, ईश्वर सवई, डी जी तुपसाखरे, प्र.सोनू वाघमारे, ईरबा शेळके, संदिप गोवंदे, भिमराव वाघमारे, करूणा खंडेलोटे, किशोर कवडीकर, संदिप गायकवाड, बालाजी देवके, रॅकी देवसकवाड, संतोष वाघमारे कार्लेकर, कैलास सोनकांबळे, पी जी गिलचे, साहेबराव तुरेराव, बापूराव रिट्ठेकर, पांडूरंग सोनकांबळे, वसंत सवई, राजेश सवई, बालाजी वाघमारे सरपंच, मारोती भेरजे, अकबर शेख, आनंदा पवार, स्वप्निल भोसीकर, संदिप लांडगे, सचिन खंडेलोटे, भीमराव सवई, गजानन आडगुडवाड, त्रिरत्न सवई, शेख शकील, अजित सोनकांबळे, अविनाश सवई, सिध्दार्थ वाघमारे, दिंगाबर गायकवाड, राहुल खंदारे आदी संविधान प्रेमी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. पोलिस निरीक्षक अंकुश माने सह सर्व पोलीस स्टॉप यांनी पोलीस प्रशासनाचा चोखबंदोबस्त ठेवून कायदा व सुव्यस्था अबाधीद ठेवून उमरी कडकडीत बंद मध्ये काळजी घेवून निषेध मोर्चास सहकार्य केले असून विशेष म्हणजे उमरी वाशीयांचे मोर्चेकर संजीव सवई यांनी अभार मानले आहे .

# ट्रॅक्टर व स्कुटीच्या धडकेत एक ठार, एक जखमी



**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. १५ डिसेंबर**

१४ डिसेंबर रोजी दुपारी बाराच्या दरम्यान ट्रॅक्टर व स्कूटीच्या धडकेत एक ठार तर एक जखमी झाल्याची घटना घडली. नांदेड लातूर राष्ट्रीय महामार्ग ३६१ वर शेलगाव (धा.) व हरसद शिवरस्त्या लगद १४ डिसेंबर रोजी दुपारी बाराच्या दरम्यान नांदेड कडून लोह्याकडे ऊस भरून जाणारा ट्रॅक्टर हा आपल्या दिशेने जात असताना त्याच्या पाठीमागून भरधाव वेगात एम एच २६ सी.ए ९०१९ या क्रमांकाची स्कुटी ही त्या ट्रॅक्टरच्या ट्रॉली खाली गेली त्या अपघातामध्ये ओमकार देशमुख वय २६ वर्ष हा जागीच ठार झाला तर निखिल चौत्रे वय ३० वर्ष हा जखमी झाला आहे. हे दोघेही नांदेड येथील रहिवासी आहेत.

Made with Xodo PDF Reader and Editor



# हुडहुडी : किमान पारा आला खाली; संभाजीनगर १०.६

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : फेंगल चक्रीवादळामुळे वाढीत असलेल्या किमान तापमानानंतर आता फेंगलचा प्रभाव संपुष्टात आल्याने किमान पाऱ्यात घसरण सुरू झाली आहे. मागील दोन ते तीन दिवसांमध्ये तापमानात कमालीची घसरण झाल्याची नोंद करण्यात आली आहे. शनिवार, १४ रोजी किमान तापमान १०.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली आहे.

दक्षिणेत फेंगल चक्रीवादळाने जवळपास आठवडाभर धुमाकूळ घातला. याचा मोठा परिणाम मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दिसून आला. छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यातही याचा प्रभाव जाणवला. ऐन हिवाळ्यात दिवसभर ढगाळ वातावरणामुळे किमान तापमानाने तब्बल २४ अंशापर्यंत उसळी घेतली होती. मात्र, आता चक्रीवादळ संपले असल्याने वातावरणातदेखील गारवा वाढू लागला आहे. मागील तीन ते चार दिवसात झपाट्याने किमान तापमानाची घसरण अनुभवायला मिळाली.

शनिवार, १४ डिसेंबर रोजी यात आणखी घट होऊन पारा १०.६ अंशावर येऊन ठेवला. शनिवारी कमाल तापमान २७.६, तर किमान तापमान १०.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली आहे.

रुग्णांची संख्या वाढतेय

दरम्यान, वातावरणात गारवा वाढल्याने सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी अशा व्हायरल आजारांची साथ सुरू झाली आहे. शहरातील दवाखाने व्हायरल रुग्णांनी भरले आहेत. लहान मुले तसेच ज्येष्ठांना याचा अधिक त्रास होत असल्याचे डॉ. अभय शिरसाट यांनी सांगितले.


दिवसभर गारवा...

थंडीपासून बचावासाठी ठिकठिकाणी स्वेटर, मफलर, कानटोप्या विक्रीची दुकानांवर ग्राहकांची झुंबड उडाल्याचे दिसून येत आहे. सध्या दिवसभर वातावरणात गारवा असून, रात्री कमालीची हुडहुडीचा अनुभव येत असून, पहाटे यात आणखी वाढ होत आहे. यामुळे सकाळी 'मॉर्निंग वॉक' करणाऱ्यांची संख्याही घटल्याचे चित्र आहे.

गहू, हरभऱ्याला लाभ

दरम्यान, वाढत्या थंडीमुळे गव्हाचे पीक जोमाने बहरत आहे. सध्या गव्हासोबतच हरभरादेखील जोमाने वाढत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. ही थंडी गहू हरभरा पिकासाठी उपयुक्त असल्याचे डॉ. एस. बी. सूर्यवंशी यांनी सांगितले.

## अनिल एंडोले, राजेश राऊत, सी.आय.एस.एफ., सागर इंगळे सी.आर.पी.एफ.मध्ये निवड


तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ डिसेंबर

सोयगाव शहरातील अनिल एंडोले (सी.आय.एस.एफ.), राजेश राऊत, (सी.आय.एस.एफ.), सागर इंगळे (सी.आर.पी.एफ.) मध्ये निवड झाली आहे.यासाठी ते गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न करीत होते. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. त्याबद्दल सोयगाव शहरातील मित्रपरिवार व त्यांचे नातेवाईक त्यांचे अभिनंदन करीत आहे. तसेच त्यांचे नगरपंचायत कार्यालय सोयगावच्या वतीने नगरसेवक यांच्या हस्ते फुल गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला,तसेच शहरातील शेतकरी,व्यापारी,पत्रकार यांनीही त्यांचा सत्कार केला. तसेच सायंकाळी त्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली होती.

## श्रीपारदेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्थेच्या वतीने पळशी येथील श्रीपारदेश्वर शिव महादेव मंदिर स्वच्छता अभियान शुक्रवारी, १४ डिसेंबर रोजी घेण्यात आले. सकाळी ९ ते ११ या वेळेमध्ये आयोजित या अभियानात अनेक भक्तगण उत्स्फूर्त सहभागी झाले होते.

मंदिर परिसराची स्वच्छता झाल्यानंतर श्रीपारदेश्वर शिव महादेवाला महाभिषेक करून महाआरती करण्यात आली. संस्थेचे कोषाध्यक्ष संदीप बेदरकर यांच्या वतीने सर्वांना प्रसाद वाटप करण्यात आला. मंदिराचे अध्यक्ष आनंद मिश्रा शास्त्री महाराज यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांच्या हस्ते शाल श्रीफळ देवून करण्यात आला. मंदिराच्या सचिव जयेशा वाघुलकर यांचा सत्कार मीरा गाडेकर व पूजा काकडे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देवून करण्यात आला. श्रीपारदेश्वर शिव महादेवासमोर संघटक तसेच प्रसिद्ध गायक हेमंत चारठाणकर यांनी शिवस्तुती सादर केली.

अध्यक्ष सुहास ठोसर यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. विक्रम काकडे यांनी सूत्रसंचालन करून आभार प्रदर्शन केले.

यावेळी संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत राजूरकर, सहसचिव प्रकाश सनान्से, सहकोषाध्यक्ष संदीप बेदरकर, संपर्कप्रमुख नरेश देवळे, संघटक हेमंत चारठाणकर, तज्ज्ञ सल्लागार सुरेश जोशी, प्रदीप देशमुख, विठ्ठल मुंडे, विक्रम काकडे, नितीन जोशी, सुधीर पोतदार, दीपक कुलकर्णी, संतोष संत्रे, शशिकांत कुलकर्णी, श्रीधर कुलकर्णी, संजीव वाघ, दत्ता भोसले, अरुण देशमुख, राहुल कुलकर्णी, भगवान इंगळे, सुहास साखरे, नामदेव दांडगे, अक्षय गोरे, महेश पाटील, संतोष खळे, राजेंद्र बिराजदार, संतोष देशपांडे, विजय वेलदे, महेश कुलकर्णी, मीरा गाडेकर व पूजा काकडे यांच्यासह इतर शिवभक्त उपस्थित होते.

# एमजीएममध्ये खेळाडूंसाठी दर्जात्मक सुविधा उपलब्ध : पोलिस उपायुक्त नितीन बगाटे

## एमजीएम ऑलिंपिकचा समारोप समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न




छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : खेळ हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असून आज शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठात सर्व क्रीडा सुविधा, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्रे उपलब्ध आहेत. एमजीएम विद्यापीठाने खेळाडूंची गरज लक्षात घेऊन अत्यंत चांगल्या प्रकारच्या क्रीडा सुविधा येथे उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा वपर करून विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करावे, असे प्रतिपादन पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशनच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून एमजीएम विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एमजीएम ऑलिंपिकचा समारोप समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत एमजीएम क्रिकेट स्टेडियम एमजीएम विद्यापीठ परिसर येथे संपन्न झाला. यावेळी पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, रणजीत कक्कड, डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, क्रीडा विभागप्रमुख प्रा.डॉ. दिनेश वंजारे, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, खेळाडू व सर्व संबंधित उपस्थित होते.

पुढे बोलताना पोलिस उपायुक्त नितीन बगाटे म्हणाले, एमजीएम ऑलिंपिक या स्पर्धेत अनेकांनी पदके जिंकली असतील तर काहींना पराभव पत्करावा लागला असेल. आपला खेळामध्ये पराभव झाला असला तरी खेळ माणसाला आयुष्यात पुन्हा एकदा लढण्याची खेळण्याची प्रेरणा देत असतो. वैयक्तिक आणि सांघिक क्रीडा प्रकारांत एका जिद्दीने आपण सर्वांनी खेळला आहात. ज्यांना पारितोषिक मिळाले आहे त्यांचे खूप सारे अभिनंदन आणि ज्यांना पारितोषिक मिळाले नाही त्यांचेही कौतुक मी या निमित्ताने करतो. कारण, आपल्याला पारितोषिक जरी मिळाले नाही तरी आपल्याला या स्पर्धेदरम्यान खूप काही गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत. एमजीएम विद्यापीठाने या स्पर्धा आयोजित केल्या त्याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन करतो आणि स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा!

दरवर्षी एमजीएम संस्थेंतर्गत असणाऱ्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'एमजीएम ऑलिंपिक' अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षीच्या स्पर्धा मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४ ते गुरूवार, दिनांक १२ डिसेंबर २०२४ दरम्यान एमजीएम स्टेडियम येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत एमजीएम संस्थेच्या नांदेड, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

सर्व विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र तर विजेत्या संघांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावर्षीच्या स्पर्धत एमजीएम नवी मुंबईच्या संघाने सर्वांना मागे टाकत १२३ गुणांसह 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप' मिळवली. तर उपविजेतेपद एमजीएम विद्यापीठाने प्राप्त केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ.शशिकांत सिंग, डॉ. श्रीनिवास मोतीयेळे, डॉ. सदाशिव जव्हेरी, प्रा.रहीम खान, डॉ.अमरदीप असोलकर, बालाजी शेळके, जॉय थॉमस, प्रविण शिंदे व सर्व संबंधितांनी आपले योगदान दिले आहे. 'एमजीएम ८ व्या ऑलिंपिक' स्पर्धेतील निकाल अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्या संघाची नावे खालीलप्रमाणे आहेत.

# लोकसहभागातून खेड्याचा शाश्वत विकास झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही : डॉ. पुरुषोत्तम भापकर




छत्रपती संभाजीनगर : लोकसहभागातून खेड्याचा शाश्वत विकास झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही, असे प्रतिपादन माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी शनिवारी, १४ डिसेंबर रोजी येथे केले. ग्रामविकास संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सिडको एन-२ येथील ग्रामविकास भवनमध्ये आयोजित 'ग्रामविकासाची सद्यस्थिती : आव्हाने व उपाययोजना कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी भापकर बोलत होते. याप्रसंगी डॉ. सर्जेराव ठोंबरे, नरहरी शिवपुरे, डॉ. भगवानराव कापसे, कैलास तवार, अप्पासाहेब उगले, मनोहर सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. भापकर म्हणाले, गाव हेच मंदिर समजून सरपंचांनी गावच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम राबवावा. युवकांनी ग्रामविकासाला सक्रिय योगदान देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्षीय समारोपात डॉ. सर्जेराव ठोंबरे म्हणाले, कार्यशाळेला उपस्थिती सर्वजण सामाजिक बांधिलकी म्हणून प्रत्यक्ष कृती करणारे असल्यामुळे या कार्यशाळेला विशेष महत्त्व आहे. विकसित भारत, समर्थ भारताकरिता ग्रामीण भागाचा विकास होणे, ही काळाची गरज आहे.

शेतीसंबंधी सांगोपांग चर्चा

कार्यशाळेत अनुक्रमे ग्रामविकासाची सद्यस्थिती आव्हाने व उपाययोजना, शेती, स्वयंरोजगार, शिक्षण या विषयांवर डॉ. भगवानराव कापसे, सुनील कस्तुरे, श्रीकांत कुलकर्णी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यात सद्यस्थितीमध्ये ८० टक्के शेतकरी, अल्पभूधारक सिंचनासह मूलभूत सुविधांचा अभाव, बेरोजगारी, स्थलांतर, वाढते शहरीकरण, आव्हाने, बदलते हवामान, शेतमालाचे भाव, ग्राहक केंद्रित शासकीय धोरण, उपायांमध्ये मूलभूत सुविधा, कृषी उद्योग, शेतीला प्रतिष्ठा, गटशेती, रोजगारक्षम उच्च दर्जाचे शिक्षण यावर सविस्तर मार्गदर्शन व चर्चा झाली.

याप्रसंगी अरविंद केंद्रे, प्रा.जयप्रकाश बागडे, अशोक गुरनाळे, रामचंद्र पिल्दे, दिगंबर निकाळजे, शिवाजीराव घुगे, प्रा. उषा वटाणे, बाबासाहेब गोजरे, दादासाहेब शिंदे, राम वाघ, अर्जुनराव ढगे, मीनाक्षी बिराजदार यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन भारती खरटमल यांनी, तर आभार बालाजी बिरादार यांनी मानले.

कार्यशाळेसाठी स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, प्रगतशील शेतकरी, अभ्यासक, संशोधक, महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी रवींद्र वासनिक, रवींद्र सातदिवे, निवृत्ती घोडके, अर्चना पवार, संदीप शिंदे, प्रणिता साळवे, दीपाली राऊत, प्रकाश राठोड यांनी परिश्रम घेतले.

# गीता पठण स्पर्धा, दत्त जयंती उत्साहात साजरी

## आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत आयोजन

छत्रपती संभाजीनगर : शनिवारी, १४ डिसेंबर रोजी मॉन्टेसोरी शिक्षण संस्था आणि गीता परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने गीता जयंती आणि दत्त जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. सामूहिक गीता पठणानंतर विशेष गीता पठण स्पर्धेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दत्त जयंतीचा पावन मुहूर्त साधून ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये गीतेचे ज्ञान रुजविण्यासाठी आणि संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी आयोजित करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ रमेश मालाणी, संस्थेचे सचिव गोविंद अग्रवाल, संस्थेचे सहसचिव प्रफुल्ल मालाणी, संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. गिरीश सावजी, संस्थेचे मान्यवर डॉ. श्रीकांत सावजी, निलेश महाजन, संजय गादिया, श्रीमती सुवर्णा गिरमे, श्रीमती शशिकला बोराडे यांनी प्रोत्साहन दिले. गीता परिवारच्या शोभा मालाणी यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. प्रतिमा पूजन आणि भगवद्गीता ग्रंथ पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ओंकाराने प्रारंभ केला. विद्यार्थ्यांनी गीतेतील श्लोकांचे पठण केले. प्रत्येक श्लोकाचा त्यांनी स्पष्ट उच्चार व गेय पद्धतीने सादरीकरण केले. ज्यामुळे वातावरण आध्यात्मिक आणि शांतीमय झाले. या विद्यार्थ्यांची तयारी श्री राजमाने सर व श्री खेळवणे सर यांनी करून घेतली.

गीता म्हणजे केवळ धार्मिक ग्रंथ नसून, जीवनाचे वास्तव आणि कर्तव्याचा सखोल मार्ग दाखवणारा ग्रंथ आहे, असे प्रास्ताविक भाषणात प्रथम सत्राचे इन्चार्ज अजय तुपे यांनी सांगितले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अध्याय बारावा, अध्याय पंधरावा, अध्याय सोळावा पठण केले. मॉन्टेसरी बालक मंदिर प्राथमिक विभाग सहावी सातवीतील नऊ विद्यार्थी सहभागी झाले होते. आ. कृ. वाघमारे प्रशाला आठवी ते दहावीतील दहा विद्यार्थी सहभागी झाले होते. गीता पठण स्पर्धा दत्त जयंती निमित्ताने उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी खूप सुंदर प्रकारे गीता अध्याय सादर केले असे छत्रपती संभाजी नगरच्या गीता परिवार अध्यक्ष माधुरी सोमाणी यांनी प्रतिपादन केले. या स्पर्धेचे परीक्षण इंदिरा भट्टड, मंगला राठी, खेळवणे सर यांनी केले,

## मुख्याध्यापक संजय पाटीलांचा जिल्हास्तरीय निवडीचे स्वागत



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ डिसेंबर

नुकत्याच तालुका स्तरिय विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक गटातून संजय पाटील जादू पाण्याची या साहित्य कृतीचा प्रथम क्रमांक आला असुन त्याची जिल्हा स्तरावर निवड झाली आहे.याबद्दल रंगनाथ आढाव व शिक्षक वृंद कडून पंचायत समिती कार्यालयात गटशिक्षण अधिकारी यांनी गौरव करीत शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

सोयगाव शहरातील नॅशनल मराठी स्कूल मध्ये पार पडलेल्या ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान गणित पर्यावरण प्रदर्शनात शिक्षकाकांचे शैक्षणिक साहित्य या मध्ये वि.जा. माध्यमिक आश्रम शाळा घाणेगाव तांडा येथील विज्ञान शिक्षक मुख्याध्यापक संजय पाटील यांची जादू पाढ्यांची या शैक्षणिक साहित्याचा माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक आला असून त्यांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये निवड झाली सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## आनंद जीवन छतलानी यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - कुंवारफल्ली, राजाबाजार येथील रहिवासी आनंद जीवन छतलानी (वय ३३) यांचे अल्पशा आजाराने दि.१३ डिसेंबर रोजी राहत्या घरी निधन झाले.

त्यांच्यावर दि.१३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता कैलास नगर स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहिण असा परिवार आहे.

# पद्मभूषण खा.शरद पवार व माजी जि. प. अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाने साजरा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ डिसेंबर

पद्मभूषण खा.शरद पवार व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा जेष्ठ नेते प्रदेश चिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार )अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त कै.बाबुरावजी काळे मराठी स्कुल सोयगाव मध्ये शनिवार रोजी शाळेत विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.तसेच शाळेच्या प्रांगणात निबंध स्पर्धा,धावणे स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती.या निबंध स्पर्धेत शालेय एकुण ३७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला तसेच बाल वयोगटातील विद्यार्थ्यांनीं धावणे,उंच उडी खेळात नैपुण्य मिळवले विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा आनंद व्यक्त करुन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.या स्पर्धा साठी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,उपमुख्याध्यापक सागर घाटे,मार्गदर्शक प्रा.डॉ.दादासाहेब पवार,संस्थेचे प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे ,अंजली कथलकर,शितल पवार,शितल गावांडे,आशा पंडित, नम्रता पाटील,निकिता देशमुख,रोहिणी पाटील,जयश्री श्रीवास्तव,मनिषा पाटील,शितल काटोले,विद्या पाटील, अरुणा भोई,नलिनी पाटील,योगेश काळे,हरिष कोळी, संजय डापके,रमेश कंडारे,किष्णा गोतमारे,ज्ञानेश्वर पंडित, आदींनी या स्पर्धेसाठी सहकार्य केले.

## ध्येयप्राप्तीसाठी स्वत:त बदल घडवावा : डॉ. एम. डी. शिरसाठ

छत्रपती संभाजीनगर : उद्दिष्ट स्पष्ट असतील तर यशाला सहजपणे गवसणी घालता येते. ध्येयासाठी स्वत:त संदर्भानुसार व परिस्थितीनुसार बदल घडवावा लागतो. याकरीता स्वत:मधील क्षमता ओळखायला शिका, असे मार्गदर्शक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. डी. शिरसाठ यांनी मांडले. शनिवारी, १४ रोजी विवेकानंद महाविद्यालयात आयोजित पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे होते. मंचावर उपप्राचार्य डॉ. टी. आर पाटील, उपप्राचार्या डॉ. अरुणा पाटील, विद्यार्थी संसद सचिव डॉ. वसंत निरस यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे सर्वच विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होणार आहे. काळाच्या ओघात जो चालेल तोच टिकेल. प्रत्येकाला स्वत:च्या क्षमता विकसित करून सिद्ध करावे लागेल.

# कलावंत घडवणारा सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सव : आ. संजना जाधव






तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१४ डिसेंबर - सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय व बाळासाहेब पवार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय संगीत महोत्सवाचा समारोप समारंभ सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाच्या प्रांगणात पार पाडला . या समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून कन्नड सोयगाव मतदारसंघाच्या आमदार संजना जाधव व छत्रपती संभाजी नगर सिडकोचे प्रशासक भागवत बिघोल उपस्थित होते. लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी बोलताना आमदार संजना जाधव म्हणाल्या की या संगीत महोत्सवाच्या माध्यमातून कन्नड सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. याचा फायदा घेऊन भविष्यात कन्नड मधून महाराष्ट्रात मोठे कलावंत निर्माण होतील.सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयाच्या माध्यमातून स्पर्धात्मक विद्यार्थी घडविण्यासाठी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याचा फायदा विद्यार्थी कलावंतांनी करून घ्यावा असे आवाहन त्यांनी केले या महोत्सवात विविध लोककला, लोकनृत्य,लोकगायन यांचे सादरीकरण झाले यात मुलींचा लक्षणीय सहभाग होता.या कार्यक्रमासाठी मानसिंह पवार ,प्राचार्य डॉ विजय भोसले, प्राचार्य डॉ राहुल क्षीरसागर ,रामकृष्ण पवार, रुपेश मोरे यांच्यासह कन्नड मधील प्रतिष्ठित नागरिक, पालक, विद्यार्थी कलावंत व मोठ्या प्रमाणात रसिक श्रोते उपस्थित होते.